cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

## संपादकीय....

### दिमागी नक्षल'चा शिक्का आणि सत्तेची भाषा!

शिक्षक दिन. देशातील प्रतिष्ठित श्रीराम कॉलेज ऑफ कॉमर्सच्या शताब्दी सोहळ्याचे व्यासपीठ. समोर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी. अशा प्रसंगी अपेक्षा असते ती शिक्षण, संशोधन, रोजगार, विद्यार्थ्यांची स्वप्ने, देशाची अर्थव्यवस्था आणि नव्या पिढीसमोरील आव्हाने यावर गंभीर, विधायक आणि दिशादर्शक संवादाची. मात्र, सत्तेच्या राजकारणाची सावली प्रत्येक व्यासपीठावर पडू लागली की शिक्षणाचे मंदिरही त्यातून सुटत नाही, हे पुन्हा एकदा जाणवले. पंतप्रधानांनी तरुणांशी त्यांच्या भाषेत संवाद साधण्याचा प्रयत्न केला. पण त्याच संवादात 'दिमागी नक्षल' हा शब्दप्रयोग आला आणि चर्चेचा केंद्रबिंदू शिक्षणापासून राजकारणाकडे सरकला. तरुणांच्या भाषेत बोलायचे आणि त्याच वेळी वेगळा विचार करणाऱ्यांना एका धोकादायक शिक्क्याखाली ढकलायचेहीच का नव्या भारतातील वैचारिक संवादाची नवी पद्धत?

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-१६८ | सोमवार दि.०७ सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

# राज्याचे ऊस गाळप धोरण बुधवारी ठरणार

## मंत्री समितीच्या बैठकीत घेतले जाणार निर्णय, मुख्यमंत्र्यांसह दोन्हीही उप मुख्यमंत्री राहणार उपस्थित

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्याच्या चालू ऊस गाळप हंगामाचे धोरण ठरविण्यासाठी बुधवारी (दि. ९) मंत्री समितीची बैठक होणार आहे. मुंबईतील सह्याद्री राज्य अतिथिगृहात दुपारी साडेबारा वाजता होणाऱ्या या बैठकीत गाळप हंगामाची तारीख निश्चित होण्याची शक्यता आहे.**

साखर आयुक्तालयातील एका अधिकाऱ्याने सांगितले, की मंत्री समितीची बैठक या महिन्यात होण्याची शक्यता नव्हती. गेल्या हंगामात गाळप एक नोव्हेंबरपासून सुरू करण्यात आले होते. मात्र, यंदाचा (२०२६-२७) ऊस गाळप हंगाम लवकर सुरू करावा, असा आग्रह थेट केंद्र सरकारने धरला आहे. त्यामुळे केंद्राच्या सोयीसाठी मंत्री समितीची बैठक यंदा वेळेवर घेतली जात आहे. त्यासाठी सहकारासह विविध विभागांमध्ये पूर्वतयारीची धावपळ सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या



बैठकीत मागील गाळप हंगामाचा आढावा घेतला जाणार असून, खासगी व सहकारी साखर उद्योगातील समस्यांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या बैठकीसाठी सहकार, कृषी, जलसंपदा, उद्योग तसेच वित्त खात्याचे मंत्री व सचिव उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाने संघाचे अध्यक्ष पी. आर. पाटील, विस्माचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे, महाराष्ट्र राज्य सहकारी (शिखर) बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, राष्ट्रीय सहकारी साखर संघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील तसेच साखर संघाचे व्यवस्थापकीय संचालक संजय खताळ यांना बैठकीसाठी निमंत्रित करण्यात आले आहे. राज्याचा चालू ऊस गाळप हंगाम मागील हंगामासारखाच राहण्याची शक्यता वर्तविली जात आहे. गेल्या हंगामात १४ लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रावर ऊस होता. त्यातून गाळपासाठी ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### ग्रामपंचायत आरक्षणाच्या नियमांवर वंचितचा आक्षेप

मुंबई : ग्रामपंचायत निवडणूक नियमावलीतील काही तरतुदी आणि आरक्षण निश्चित करण्यासाठी प्रशासनाकडून राबवली जाणारी पद्धत ही अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय तसेच महिलांच्या राजकीय प्रतिनिधित्वावर परिणाम करणारी असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे. ग्रामपंचायत आरक्षणातील 'अपूर्णांकातील जागा मोजण्याची' पद्धत आणि संबंधित प्रवर्गाची लोकसंख्या शून्य असलेल्या प्रभागांमध्ये आरक्षण लागू करण्यास पक्षाने तीव्र आक्षेप घेतला आहे. वंचित बहुजन आघाडीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पातोडे यांनी याबाबत जून महिन्यात तक्रार दाखल केल्याचे सांगितले आहे. सरपंच पदाचे आरक्षण राज्यात तिसऱ्यांदा काढण्यात येणार असताना आरक्षण प्रक्रियेतील नियम आणि त्यांची अंमलबजावणी यांची फेरतपासणी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. राजेंद्र पातोडे म्हणाले की, अनेक ग्रामपंचायतींमध्ये चक्रानुक्रम राबविताना संबंधित प्रवर्गाची लोकसंख्या विचारात न घेता आरक्षण निश्चित केले जात आहे. ज्या प्रभागात अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती प्रवर्गाची एकही व्यक्ती किंवा मतदार नाही, म्हणजेच संबंधित प्रवर्गाची लोकसंख्या शून्य आहे, अशा ठिकाणीही आरक्षण टाकले जात असल्याचा आरोप केला.

### पंतप्रधान ही केवळ व्यक्ती नसून एक संस्था-इराणी

नवी दिल्लीः जंतरमंतर येथे नुकत्याच पार पडलेल्या जेन-झी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या ज्येष्ठ नेत्या स्मृती इराणी यांनी मोठे आणि महत्त्वपूर्ण विधान केले आहे. ''पंतप्रधान ही केवळ एक व्यक्ती नसून ती एक घटनात्मक संस्था आहे, त्यामुळे त्या पदाला कोणीही शिवीगाळ करू शकत नाही,'' अशा स्पष्ट शब्दांत त्यांनी आंदोलकांच्या भूमिकेवर आक्षेप नोंदवला. टाइम्स नाऊला दिलेल्या विशेष मुलाखतीत त्या बोलत होत्या. स्मृती इराणी म्हणाल्या की, ''पंतप्रधान हे केवळ एक व्यक्ती नसून संपूर्ण व्यवस्थेचे प्रतिनिधित्व करणारी एक सर्वोच्च संस्था आहे. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत देशातील सुमारे ६४ कोटी नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावला. लोकांनी कोणालाही मत दिले असले, तरी यावरून स्पष्ट होते की देशातील जनतेचा या घटनात्मक व्यवस्थेवर आणि संस्थेवर गाढ विश्वास आहे; आणि म्हणूनच त्यांनी मतदान केले.

### मोदी लोकांच्या संपर्कात नाहीत-मल्लिकार्जुन खर्गे

दिल्लीः शिक्षण, रोजगार आणि युवा कल्याण यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी जबाबदारी टाळण्यासाठी मोदी राजकीय विशेषणांचा वापर करत आहेत, अशा शब्दांत पंतप्रधान मोदींवर काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी टिका केली. खर्गे म्हणाले, तुम्ही दिल्ली विद्यापीठातील श्री राम कॉलेजला भेट दिलीत. देशातील युवा, शिक्षण आणि त्यांचे भविष्य यावर संवाद साधण्याची ती एक संधी होती. पण दुर्दैवाने, तरुणांच्या प्रश्नांना सामोरे जाण्याऐवजी, ते भाषण पुन्हा एकदा राजकीय प्रचारात बदलले. मोदी स्वतःचे अपयश लपवण्यासाठी विरोधकाइंसाठी नवीन विशेषणे शोधून लोकशाहीतील प्रश्न दाबण्याचा प्रयत्न करत आहेत. विशेषणे बदलत असली तरी मोदी सरकारची जनविरोधी धोरणे मात्र तशीच राहतात. लोकशाहीत प्रश्न दाबण्यासाठी दरवर्षी विरोधकांना नवीन विशेषण द्यायचे जेणेकरून त्यांचे स्वतःचे अपयश लपलेले राहील.

# गणेश उत्सवात दंगली घडवल्या जातील

## राज ठाकरे यांच्या वक्तव्याने खळबळ



**ठाणे । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा राज्यस्तरीय पदाधिकारी मेळावा ठाण्यातील राम गणेश गडकरी रंगायतन नाट्यगृहात झाला. या मेळाव्यामध्ये मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी खळबळजनक दावा केला असून, गणेशोत्सवात दंगल घडवण्यात येणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.**

ठाकरे म्हणाले, देशातील प्रश्नांना बगल देण्यासाठी दंगली घडवण्याचा डाव आहे. त्यासाठी मोठी यंत्रणा राबवली जात आहे. ▶▶ पान २ वर

### महापुरुषांच्या रांगेत पंतप्रधानांचा फोटो नको

राज ठाकरे म्हणाले की, अमित ठाकरे पुण्यात गेले त्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो काढण्यावरून वाद झाला. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या रांगेत दुसरे कोणी बसू शकत नाही. पंतप्रधानांचा फोटो सरकारी कार्यालयात लावला जावा का तर हो, पण तो दुसऱ्या भिंतीवर लावला पाहिजे. महापुरुषांच्या रांगेत पंतप्रधानांचा फोटो लावू नये. पण कोणत्या रांगेत कोणाचा फोटो पाहिजे हे सर्वांना कळले पाहिजे. त्यामुळे आताच ही गोष्ट सुधारा.

# विश्वास नांगरे-पाटील यांनी कुणबी दाखल्याचा वापर केला!

## अंतरवालीत ओबीसींचेही आंदोलन, २ सप्टेंबरचा जिआर रद्द करण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी**

मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण, कुणबी प्रमाणपत्र आणि जातपडताळणीच्या मागण्यांवरून अंतरवाली सराटीत आंदोलन सुरू असतानाच आता ओबीसी आंदोलकांनीही ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. ओबीसी आरक्षणात इतर समाजाचा समावेश करू नये, अशी मागणी आंदोलकांनी केली



आहे. २ सप्टेंबर रोजी जारी करण्यात आलेला शासन आदेश रद्द करावा, तसेच शिंदे समिती आणि जातपडताळणी समितीविरोधात सरकारने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी ओबीसी आंदोलकांनी केली आहे. सरकारी नोकऱ्यांमध्येही शिरकाव होत असून, नांगरे पाटील हेही ओबीसीतूनच आले आहेत, असे आंदोलकांनी म्हटले आहे.

ॲड. मंगेश ससाणे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या मागण्यांसाठी उपोषण सुरू केले आहे. सरकार जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य करण्यासाठी ओबीसी आरक्षणातील वाटा देत असल्याचा आरोप ससाणे यांनी केला. राधाकृष्ण विखे पाटील आणि ▶▶ पान २ वर

# शिवसेनेच्या १७ पदाधिकाऱ्यांवर गुन्हा; आमदाराच्या मुलाचाही समावेश



**मुंबई । प्रतिनिधी**

दहीहंडी उत्सवादरम्यान जखमी झालेल्या गोविंदांच्या वैद्यकीय बिलांवरून रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांवर हल्ला करणे, शिवीगाळ करणे आणि धमकावणे या आरोपाखाली शिवसेनेच्या १७ पदाधिकाऱ्यांवर रविवारी गुन्हा दाखल करण्यात आला. यामध्ये पक्षाचे पालघर जिल्हा आणि शहर प्रमुख तसेच एका आमदाराच्या मुलाचा समावेश आहे.

गुन्हा दाखल करण्यात आलेल्या १७ जणांपैकी १० जणांची नावे निष्पन्न झाली आहेत. यात शिवसेनेचे जिल्हा प्रमुख कुंदन बाळकृष्ण सांखे, शहर प्रमुख राहुल रामदास घरत आणि ▶▶ पान २ वर

# महावितरणचे ३२,६७९ कोटींचे कर्ज सरकार घेणार अंगावर

**मुंबई । प्रतिनिधी**

महावितरणच्या आर्थिक पुनर्रचनेच्या दिशेने राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. महावितरणच्या डोक्यावर असलेले तब्बल ३२ हजार ६७९ कोटी रुपयांचे कर्ज राज्य सरकार स्वतःकडे घेणार असून, या कर्जाची मुद्दल रक्कम आणि त्यावरील व्याज सरकारकडूनच फेडले जाणार आहे. त्यामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या महावितरणला मोठा दिलासा मिळणार असला, तरी व्याजासह सुमारे ४५ हजार ६९४ कोटी रुपयांचा आर्थिक भार राज्याच्या तिजोरीवर पडणार आहे.

## मुद्दल-व्याज शासनच देणार; राज्याच्या तिजोरीवर व्याजासह ४५,६९४ कोटींचा भार



ऊर्जा विभागाने २१ ऑगस्ट रोजी जारी केलेल्या शुद्धीपत्रकाद्वारे यापूर्वीच्या निर्णयात बदल केला आहे. आधी महावितरणच्या कर्जासाठी १५ वर्षांच्या मुदतीचे सरकारी रोखे काढण्याची योजना होती. मात्र, ▶▶ पान २ वर

# मराठा आंदोलकांचे थेट आ. कोहळीकरांच्या कार्यालयातच उपोषण

**नांदेड । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर हदगाव येथे मराठा आंदोलकांनी शिंदे सेनेचे आ. बाबुराव कोहळीकरांच्या हदगाव येथील संपर्क कार्यालयात धडक देत आरक्षणाच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी तेथेच आमरण उपोषण सुरू केले आहे. यामुळे आ. कोहळीकरांचा ताण वाढला आहे.

मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, या प्रश्नावर शासनाने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलकांकडून करण्यात आली. यावेळी मराठा आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली व कार्यालयातच ठिय्या मांडला. आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यभर आंदोलनाची भूमिका तीव्र होत असताना हदगावमध्येही शिंदे सेनेचे आ. कोहळीकर यांच्या कार्यालयात आंदोलकांनी आपली भूमिका आक्रमकपणे मांडली. आंदोलकांनी आरक्षणाच्या प्रश्नावर शासनाने केवळ आश्वासने न देता ठोस व कायदेशीर निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. यावेळी मोठ्या संख्येने मराठा समाजबांधव ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०४ सप्टेंबर २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः १८.५० क्विंटल | २,५५१ | २,८०० | २,६७५ |
| ज्वारी/हायब्रिड : ८५.०० क्विंटल | १,५०० | ३,८४५ | २,८३० |
| मका/लोकलः ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर : ३३.०० क्विंटल | ७,३०० | ८,२६० | ८,०६२ |
| उडीद : २३.५० क्विंटल | ८,२५० | ८,२५० | ८,२५० |
| बाजरीः १८.०० क्विंटल | २,२१० | २,७९५ | २,६१२ |
| मुगः १०.०० क्विंटल | ९,२५० | १०,०९२ | ९,४५२ |
| सोयाबीनः १९.५० क्विंटल | ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| हरभराः ४.०० क्विंटल | ५,१०० | ६,९०० | ६,००० |

# आरक्षणाच्या कात्रीत सरकारची सुपारी

## मराठा, ओबीसी आणि एसटी मागण्यांमुळे सामाजिक संघर्ष शिगेला





**बीड-जालना । प्रतिनिधी**

**महाराष्ट्रात सध्या आरक्षणाचा तिढा कमालीचा गुंतागुंतीचा झाला असून राज्याचे राजकारण पूर्णपणे तापले आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण हवे आहे, तर धनगर, बंजारा समाजाकडून अनुसूचित जमाती प्रवर्गाचा दर्जा मिळवण्याची मागणी जोर धरत आहे. विविध समाजांच्या या परस्परविरोधी मागण्यांमुळे सत्ताधारी महायुती सरकार मोठ्या राजकीय कात्रीत अडकले आहे.**

जालन्यातील अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी पुन्हा एकदा आमरण उपोषण सुरू केले आहे. सरकारी शिष्टमंडळाने भेट दिल्यानंतर काही मागण्यांवर चर्चा झाली असली, तरी सर्व मागण्यांची अंमलबजावणी करण्यासाठी जरांगे पाटील यांनी सरकारला ११ सप्टेंबरची अंतिम मुदत (डेडलाईन) दिली आहे.





दरम्यान, याच गावात ओबीसी आरक्षण बचाव समितीचे ॲड. मंगेश ससाणे यांनीही उपोषण पुकारल्याने मराठा विरुद्ध ओबीसी असा थेट संघर्ष एकाच रणभूमीवर पाहायला मिळत आहे. ''ओबीसींच्या मूळ कोट्याला धक्का लावून मराठ्यांना आरक्षण देऊ नये,'' अशी ठाम भूमिका ओबीसी आंदोलकांनी घेतली आहे. सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा साहनी खटल्यात ▶▶ पान २ वर

### छगन भुजबळ यांचा यू-टर्न

सुरुवातीला ''हा वाद मराठा समाज आणि सरकारमधील आहे, आपण मध्ये का पडायचे?'' अशी सावध भूमिका घेणाऱ्या ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ यांनी आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. ''ओबीसींवर अन्याय झाल्यास आम्हालाही रस्त्यावर उतरावे लागेल,'' असा थेट इशारा त्यांनी दिला आहे.

### गोपीचंद पडळकरांची भूमिका

सोलापूर दौऱ्यावर असताना मराठा आंदोलकांनी आमदार गोपीचंद पडळकर यांची गाडी अडवून जाब विचारला. त्यावर स्पष्टीकरण देताना पडळकर म्हणाले, ''आमचा मूळ कुणबी मराठा समाजाला अजिबात विरोध नाही; परंतु नोंदींमध्ये खाडाखोड करून बोगस कुणबी प्रमाणपत्रे मिळवणाऱ्यांना आमचा कडाडून विरोध राहील. आम्ही आता आमच्या एसटी आरक्षणासाठी लढा उभारत आहोत असेही ते यावेळी म्हणाले.

cmyk

## अग्रलेख

# दिमागी नक्षल'चा शिक्का आणि सत्तेची भाषा!

## शिक्षक दिनी विद्यार्थ्यांना विचार शिकवायचा की शिक्के मारायचे?

शिक्षक दिन. देशातील प्रतिष्ठित श्रीराम कॉलेज ऑफ कॉमर्सच्या शताब्दी सोहळ्याचे व्यासपीठ. समोर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी. अशा प्रसंगी अपेक्षा असते ती शिक्षण, संशोधन, रोजगार, विद्यार्थ्यांची स्वप्ने, देशाची अर्थव्यवस्था आणि नव्या पिढीसमोरील आव्हाने यावर गंभीर, विधायक आणि दिशादर्शक संवादाची. मात्र, सत्तेच्या राजकारणाची सावली प्रत्येक व्यासपीठावर पडू लागली की शिक्षणाचे मंदिरही त्यातून सुटत नाही, हे पुन्हा एकदा जाणवले. पंतप्रधानांनी तरुणांशी त्यांच्या भाषेत संवाद साधण्याचा प्रयत्न केला. पण त्याच संवादात 'दिमागी नक्षल' हा शब्दप्रयोग आला आणि चर्चेचा केंद्रबिंदू शिक्षणापासून राजकारणाकडे सरकला. तरुणांच्या भाषेत बोलायचे आणि त्याच वेळी वेगळा विचार करणाऱ्यांना एका धोकादायक शिक्क्याखाली ढकलायचेहीच का नव्या भारतातील वैचारिक संवादाची नवी पद्धत?

'नक्षल' हा शब्द साधा राजकीय टोमणा नाही. त्यामागे हिंसाचार, सशस्त्र संघर्ष आणि गंभीर सुरक्षाविषयक इतिहास आहे. त्यामुळे त्याला 'दिमागी' अशी जोड देऊन वैचारिक असहमती, विरोध किंवा सत्तेवर प्रश्न उपस्थित करणाऱ्यांना उद्देशले जात असेल, तर त्याचा अर्थ गंभीर ठरतो. कारण लोकशाहीत विचारांशी लढायचे असते; विचार करणाऱ्या माणसाला संशयाच्या कठड्यात उभे करायचे नसते. या वक्तव्यावर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह विरोधकांनी आक्षेप घेतला. कोक्रोच जनता पक्षाचे सौरव दास आणि आशुतोष रांका यांनीही विरोध व्यक्त केला. विरोधकांचा निषेध हा राजकारणाचा नेहमीचा भाग आहे. पण त्यापलीकडे एक मूलभूत प्रश्न उभा राहतो सत्तेची भाषा नेमकी किती व्यापक असावी? महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विचार करायला शिकवायचे की कोणता विचार 'देशहिताचा' आणि कोणता 'दिमागी नक्षल' हे सत्तेने ठरवायचे? प्रश्न विचारणारी तरुण पिढी ही लोकशाहीची ताकद असते. तिच्या प्रश्नांना उत्तरे देण्याऐवजी प्रश्न विचारणाऱ्यालाच लेबल लावण्याची सवय लागली, तर विद्यापीठांमध्ये मुक्त चर्चा कशी टिकणार? शिक्षक दिनाचा खरा अर्थ केवळ शिक्षकांचा सत्कार, पुष्पहार किंवा भाषणे एवढाच नाही. शिक्षणाचा गाभा म्हणजे विचार स्वातंत्र्य. शिक्षक विद्यार्थ्याला तयार निष्कर्ष पाठ करून घेत नाही; तो त्याला प्रश्न विचारण्याची, तर्क करण्याची, पुरावे तपासण्याची आणि स्वतःचा निष्कर्ष काढण्याची क्षमता देतो. म्हणूनच तरुणांनी सरकारचे कौतुक करावे, अशी अपेक्षा असण्यापेक्षा त्यांनी सरकारला निर्भयपणे प्रश्न विचारावेत, हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे. सत्तेवर टीका करणे म्हणजे देशविरोध नव्हे. धोरणावर प्रश्न उपस्थित करणे म्हणजे व्यवस्था उद्ध्वस्त करण्याचा कट नव्हे आणि असहमती म्हणजे हिंसक विचारसरणीचे समर्थन, असा सरधोपट निष्कर्ष तर अजिबातच नव्हे. श्रीराम कॉलेजच्या शंभर वर्षांच्या शैक्षणिक परंपरेच्या सोहळ्यात शिक्षण, ज्ञान, संशोधन आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यापेक्षा एखादा राजकीय शब्द अधिक चर्चेत येत असेल, तर त्याकडे केवळ राजकीय वाद म्हणून पाहून चालणार नाही. तो आपल्या सार्वजनिक संवादाच्या दर्जाबाबतचा गंभीर इशारा आहे. नव्या पिढीची भाषा बोलणे म्हणजे तिच्या स्लँगमध्ये बोलणे नव्हे; तिच्या प्रश्नांना सामोरे जाणे होय. तरुणांना प्रभावित करण्यासाठी त्यांच्या भाषेतील शब्द वापरणे सोपे आहे; पण त्यांच्या कठीण प्रश्नांना संयमाने उत्तरे देणे हे नेतृत्वाचे खरे कौशल्य आहे. लोकशाहीत सत्ता बदलत राहते; पण संस्थांची मूल्ये टिकली पाहिजेत. आज एखाद्या विचाराला 'दिमागी नक्षल' म्हणणे सोपे असेल, उद्या दुसरी सत्ता त्याच पद्धतीने वेगळ्या विचाराला दुसरा शिक्का मारू शकते. अशा शिक्क्यांची साखळी वाढत गेली तर शेवटी उरतो तो विचारांचा पराभव.

शिक्षक दिनी विद्यार्थ्यांना जर एक धडा द्यायचा असेल, तर तो 'कोणावर विश्वास ठेवायचा' यापेक्षा 'कशावर विश्वास ठेवायचा' हा असला पाहिजे. व्यक्तीपेक्षा विचार, घोषणेपेक्षा तथ्य आणि सत्तेपेक्षा संविधान ही लोकशाहीची खरी शिस्त आहे. देशाचे भविष्य 'दिमागी नक्षल' शोधण्यात नाही. ते स्वतंत्रपणे विचार करणाऱ्या, निर्भयपणे प्रश्न विचारणाऱ्या आणि सत्याचा शोध घेणाऱ्या नागरिकांच्या निर्मितीत आहे. शिक्षणाच्या व्यासपीठावर शिक्के नकोत; प्रश्न हवेत. भीती नको; विचार हवा. मौन नको; संवाद हवा. कारण मजबूत लोकशाहीला आज्ञाधारक डोकी नव्हे, तर स्वतंत्र विचार करणारी मने लागतात.

# परतूर पोलिसांची जुगार अड्ड्यावर धाड सहा आरोपी अटकेत

**परतुर । प्रतिनिधी**

वाई (ता. मंठा) येथील डांबरी रस्त्यालगत असलेल्या लिंबाच्या झाडाखाली काही इसम गोलाकार नावाचा जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी छापा टाकला. कारवाईदरम्यान सहा आरोपी जुगार खेळताना रंगेहात आढळून आले. सदर कारवाईत आरोपींकडून रोख रक्कम दोन दुचाकी व जुगाराचे साहित्य असा एकूण ₹१.२०.९००/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी परतूर पोलीस ठाणे गुन्हा क्र. ४२८/२०२६ अन्वये महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुरंन :-४२८/२०२६ अन्वये महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एकूण ११.२०.९००/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंग संधू मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. आर. टी. रेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुदाम भागवत यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक अमोल रावते. ग्रेड पोलीस उपनिरीक्षक खंदारे, पोलीस कॉन्स्टेबल पारवे इलग. खेडकर, गोविंद पवार, जाधव व ज्ञानेश्वर वाघ यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

# ३२ वर्षांनंतर परतूरला युवक महोत्सवाचे यजमानपद

## ६९ महाविद्यालयांतील ५८१ कलावंतांचा सहभाग; ना. मेघनाताई बोर्डीकर यांच्या हस्ते उद्घाटन

**जालना । प्रतिनिधी**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा जालना जिल्हास्तरीय युवक महोत्सव यंदा परतूर येथे होत असून, तब्बल ३२ वर्षांनंतर शहराला या महोत्सवाच्या यजमानपदाचा मान मिळाला आहे. मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर आणि स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा यांच्या संयुक्त विद्यमाने ७ व ८ सप्टेंबर रोजी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.**

महोत्सवाचे उद्घाटन महिला व बालकल्याण राज्यमंत्री ना. मेघनाताई सोकोरे (बोर्डीकर) यांच्या हस्ते सोमवारी (दि.७) सकाळी ९.३० वाजता लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाच्या प्रांगणात होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फुलारी हे उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहणार आहे. युवक महोत्सवाच्या आयोजनासंदर्भात रविवारी महाविद्यालयातील बाबासाहेब आकात सभागृहात पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी संस्थेचे सचिव व माजी अधिसभा सदस्य कपिल आकात, विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. कैलास अंभुरे, व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. भारत खंदारे, प्राचार्य डॉ. सुधाकर जाधव, जनसंपर्क अधिकारी डॉ. संजय शिंदे, डॉ. शैलेंद्र शेलार आणि डॉ. शरद बोराडे आदी उपस्थित होते. यावेळी कपिल आकात यांनी सांगितले की, युवकांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे आणि विद्यार्थ्यांमधील सुप्त कलाविष्कारांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दोन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात विविध कलाप्रकारांमध्ये विद्यार्थी आपली कला सादर करणार आहेत. महोत्सवात चार स्वतंत्र रंगमंचांवर विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. मुख्य रंगमंचावर 'सृजनरंग',



शब्दरंग, स्व. बाबासाहेब आकात सभागृहात संबंधित कला सादरीकरण, इंदिरा मंगल कार्यालयात 'ललितरंग' तसेच मराठा क्रांती भवन या ठिकाणी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. दोन दिवसांत तब्बल २२ कलाप्रकार सादर केले जाणार आहेत. विद्यार्थ्यांच्या कला, साहित्य, संगीत, नृत्य आणि विविध सांस्कृतिक अभिव्यक्तींना या महोत्सवाच्या माध्यमातून व्यापक व्यासपीठ मिळणार आहे. महोत्सवासाठी दोन्ही महाविद्यालये तसेच विद्यापीठातील संयोजन समितीचे सदस्य गेल्या काही दिवसांपासून नियोजन व तयारीमध्ये व्यस्त आहेत. युवक महोत्सवात जालना जिल्ह्यातील ६९ महाविद्यालयांमधून एकूण ५८१ विद्यार्थी कलावंत सहभागी होणार आहेत. यात २९२ विद्यार्थी आणि २८९ विद्यार्थिनींचा समावेश आहे. त्यामुळे दोन दिवस परतूर शहरात युवकांच्या कला-कौशल्याचा आणि सांस्कृतिक उत्साहाचा अनुभव नागरिकांना घेता येणार आहे, अशी माहिती विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. कैलास अंभुरे यांनी दिली. युवक महोत्सवाचा समारोप आणि पारितोषिक वितरण समारंभ मंगळवारी (दि.८) सायंकाळी ५ वाजता होणार आहे. या कार्यक्रमाला प्रकुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते आणि कवयित्री गुंजन पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून संस्थेचे सचिव कपिल आकात अध्यक्षस्थानी राहणार आहेत. या दोन्ही कार्यक्रमांना संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. कुणाल आकात, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. कैलास अंभुरे, प्राचार्य डॉ. भारत खंदारे आणि प्राचार्य डॉ. सुधाकर जाधव यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. परतूर शहराला युवक महोत्सवाच्या आयोजनाची जुनी परंपरा असून तब्बल ३२ वर्षांनंतर पुन्हा एकदा या महोत्सवाचे यजमानपद शहराला मिळाले आहे. १९९४ मध्ये याच संस्थेने केंद्रीय युवक महोत्सवाचे यशस्वी आयोजन केले होते. त्यामुळे यंदाच्या महोत्सवामुळे त्या आठवणींना पुन्हा उजाळा मिळणार आहे परतूर तालुक्याला साहित्यिक आणि ऐतिहासिक वारसाही लाभला आहे. मराठीतील प्रख्यात साहित्यिक बी. रघुनाथ यांची जन्मभूमी या परिसरात आहे. तसेच १९३७ मध्ये मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या पहिल्या अधिवेशनाचे आयोजन परतूर येथे झाले होते. अशा ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या शहरात युवक महोत्सवाचे आयोजन होत असल्याने त्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. युवक महोत्सव हा केवळ विद्यार्थ्यांचा कार्यक्रम नसून शहरातील नागरिक, पालक आणि कला रसिकांसाठीही विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा आनंद घेण्याची संधी आहे. त्यामुळे परतूर शहरातील नागरिकांनी तसेच पालक व रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून युवक महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे सचिव कपिल आकात आणि संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांचा व्यवस्थेवरील विश्वास उडाला!

## एमपीएससीवरून राहुल गांधींचा भाजपवर थेट हल्ला

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) यासारख्या घटनात्मक संस्थेवर कब्जा करून तिची विश्वासार्हता भाजप सरकारने उद्ध्वस्त केली, असा गंभीर आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधींनी केला. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित संस्थांच्या स्वायत्ततेचा आणि पारदर्शकतेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा मुद्दा पुन्हा एकदा राजकीय केंद्रस्थानी आला आहे.**



राहुल गांधी यांनी एमपीएससीच्या मुद्द्यावरून भाजप सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. महाराष्ट्रात हजारो विद्यार्थी शांततापूर्ण पद्धतीने रस्त्यावर उतरले आहेत. त्यांचा संघर्ष केवळ एखाद्या परीक्षा किंवा भरतीपुरता मर्यादित नसून विद्यार्थ्यांचा, संपूर्ण व्यवस्थेवरील विश्वासच उडाल्याचे राहुल गांधी यांनी म्हटले आहे. राहुल गांधी यांनी सोशल मीडिया पोस्टमधून केंद्र आणि राज्यातील भाजप सरकारला लक्ष्य केले. पेपरफुटी, रखडलेल्या भरती प्रक्रिया, शिक्षणाचा असह्य वाढलेला खर्च, वसतिगृहांमधील अमानवीय परिस्थिती, निकृष्ट दर्जाचे अन्न आणि डिबिटीमधील कथित गैरप्रकार यांचा उल्लेख करत त्यांनी विद्यार्थ्यांच्या संतापाला आवाज दिला. विशेषतः एमपीएससीमधील विश्वासार्हतेचा मुद्दा उपस्थित करत राहुल गांधी यांनी भाजप सरकारवर गंभीर आरोप केले. एमपीएससीसारख्या घटनात्मक संस्थेवर कब्जा करून तिची विश्वासार्हता उद्ध्वस्त केल्याचा आरोप त्यांनी आपल्या पोस्टमध्ये केला. राहुल गांधी म्हणाले की, आपल्या यशस्वी भविष्यासाठी विद्यार्थ्यांची प्रत्येक मागणी रास्त आहे. त्यामुळे सरकारने विद्यार्थ्यांचा आवाज ऐकावा, असे आवाहन राहुल गांधींनी केले. विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर तातडीने कारवाई करा, अन्यथा न्याय मिळेपर्यंत त्यांचा आवाज अधिक बुलंद होत राहील, असा थेट इशाराही त्यांनी दिला. राहुल गांधी यांच्या या भूमिकेतून भाजप सरकारविरोधातील विद्यार्थ्यांच्या असंतोषाला राजकीय धार देण्याचा प्रयत्न स्पष्टपणे दिसून येत आहे. शिक्षण, रोजगार आणि भरती प्रक्रियेतील कथित अनियमिततेचे प्रश्न केवळ विद्यार्थ्यांपुरते न राहता आता सरकारच्या कारभारावर थेट प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे ठरत आहेत.

# युनोत भारताचा नकाशा प्रस्तावाला पाठिंबा जम्मू-काश्मीर, लडाखवरून कठोर इशारा

**दिल्ली । वृत्तसंस्था**

**संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत खंडांचे अचूक आकार दर्शवणाऱ्या समान-क्षेत्र जगप्रसिद्ध नकाशांच्या वापराला प्रोत्साहन देणाऱ्या प्रस्तावाला भारताने रविवारी (दि. ६ सप्टेंबर) पाठिंबा दिला. मात्र, हा पाठिंबा म्हणजे कोणत्याही विशिष्ट नकाशाच्या प्रारूपाला किंवा आंतरराष्ट्रीय सीमांच्या चित्रणाला दिलेली मान्यता नाही, असे भारताने ठामपणे स्पष्ट केले आहे.**



संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत करेक्ट द मॅप: रीबॅलन्सिंग ग्लोबल कार्टोग्राफिक रिप्रेझेंटेशन नावाचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने आफ्रिका आणि इतर प्रदेशांचे खरी भौगोलिक व्याप्ती दर्शवणारे नकाशे वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या प्रस्तावाच्या बाजूने भारताने मतदान केले असून, परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी भारताची भूमिका स्पष्ट केली. ''हा प्रस्ताव कोणत्याही एका विशिष्ट नकाशाला प्रमाणित करत नाही, तसेच यात आंतरराष्ट्रीय सीमा, विवादित क्षेत्रे किंवा ठिकाणांच्या नावांचा समावेश नाही,'' असे जयस्वाल यांनी सांगितले. याच वेळी भारताच्या सीमांचा उल्लेख करताना त्यांनी स्पष्ट केले की, ''जम्मू-काश्मीर आणि लडाख या केंद्रशासित प्रदेशांसह भारताचा संपूर्ण भाग हा भारताच्या अधिकृत नकाशानुसारच दर्शवला गेला पाहिजे. कोणताही चुकीचा किंवा दिशाभूल करणारा नकाशा भारत अजिबात स्वीकारणार नाही. भारताचे सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेबाबतची भूमिका स्पष्ट, सातत्यपूर्ण आणि तडजोड न होणारी आहे.'' टोगो या देशाच्या पुढाकाराने आणि आफ्रिकन युनियनच्या पाठिंब्याने हा प्रस्ताव मांडण्यात आला होता. सध्या जगभरात १५६९ मध्ये विकसित केलेली मर्केटर प्रोजेक्शन पद्धत नकाशांसाठी वापरली जाते. ही पद्धत सागरी वाहतुकीसाठी उपयुक्त असली, तरी विषुववृत्तापासून दूर असलेल्या देशांचे आकार यात प्रत्यक्षापेक्षा खूप मोठे दिसतात. परिणामी, आफ्रिका खंड उत्तर गोलार्धातील देशांपेक्षा खूप लहान दिसतो. यावर उपाय म्हणून २०१८ मध्ये विकसित करण्यात आलेल्या इक्वल अर्थ पद्धतीचा वापर करण्याचे आवाहन या प्रस्तावात करण्यात आले आहे, ज्यामुळे खंडांचे वास्तविक आकार स्पष्ट दिसतील. संयुक्त राष्ट्रांचा हा ठराव बंधनकारक नाही. त्यामुळे जगातील नकाशे लगेच बदलणार नाहीत. शाळा, विद्यापीठे, डिजिटल प्लॅटफॉर्म्स आणि नकाशे छापणाऱ्या संस्था स्वेच्छेने या नव्या पद्धतीचा अवलंब करतात की नाही, यावरच या निर्णयाचा व्यावहारिक परिणाम अवलंबून असणार आहे.

## पान १ वरून...

### राज्याचे ऊस गाळप धोरण

१०४५ लाख टन ऊस उपलब्ध झाला होता. गाळलेल्या उसापासून ९९.१८ लाख टन साखरेचे उत्पादन घेत राज्याने देशात प्रथम क्रमांक पटकावला होता. गेल्या वर्षी राज्यात उसाची उत्पादकता प्रति हेक्टरी ७८ टन साखर मिळाली होती. मात्र, यंदा प्रतिकूल हवामानामुळे ऊस उत्पादन व उत्पादकतेबाबत ठाम अंदाज वर्तविणे अवघड झाल्याचे साखर उद्योगाचे म्हणणे आहे.

------------

### विश्वास नांगरे-पाटील यांनी

प्रसाद लाड प्रशासनावर दबाव आणत असल्याचाही त्यांनी आरोप केला. दरम्यान, ओबीसी आरक्षणात कथित घुसखोरीचा मुद्दा उपस्थित करत आंदोलकांनी विश्वास नांगरे पाटील यांचाही उल्लेख केला. नांगरे पाटील हे कुणबी प्रमाणपत्राच्या आधारे ओबीसी प्रवर्गातून आले असून, त्यामुळे ओबीसींच्या जागेवर परिणाम होत असल्याचा दावा आंदोलकांनी केला. 'ते पाटील आहेत, मग आमची एक ओबीसीची जागा घेतलीच ना?' असा सवाल आंदोलकांनी उपस्थित केला. जातपडताळणीच्या मुद्द्यावरही आंदोलकांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. प्रसाद लाड यांनी जातपडताळणीबाबत कोणत्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली, असा सवाल ओबीसी आंदोलक विठ्ठल तळेकर यांनी केला. २ सप्टेंबरचा शासन आदेश रद्द करण्यासह ओबीसी आरक्षणाचे संरक्षण आणि आंदोलकांच्या विविध मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा ओबीसी आंदोलकांनी दिला आहे. यावेळी मयत ओबीसी आंदोलकांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत आणि सरकारी नोकरी द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. अंतरवालीत आमचे तिसरे उपोषण आहे, अंतरवाली आता उपोषण पंढरी झाली आहे, सगळे इथंच येतात म्हणून आम्हीही अंतरवालीतच उपोषण करत आहोत, असे ओबीसी आंदोलकांनी म्हटले आहे.

------------

### गणेश उत्सवात दंगली घडवल्या

पण भाजपमधील लोक त्यावर बोलू शकत नाहीत, या राज्याचे नागरीक म्हणून तुम्ही सतर्क राहा. जाणीवपूर्वक ते हे करतील, तुम्ही या गोष्टीपासून दूर राहा. सोशल मीडियावर पण हा मुद्दा चर्चेत आहे. आता १४ तारखेला गणपती येतील. मला सर्वाधिक भीती आहे की, गणपतीच्या दिवसात दंगली घडवल्या जातील. केवळ महाराष्ट्रात नाही म्हणत मी, देशात दंगली घडवल्या जातील, जेणेकरून तुम्ही त्यात अडकले पाहिजे, तुमचे इतर गोष्टीकडे दुर्लक्ष झाले पाहिजे. आताच मुंबईत त्याची झलक पाहिली तुम्ही. एक दोन घटना घडल्या. ही सुरुवात आहे. जो सुजाण हिंदू आहे. जो सुजाण मुस्लिम आहे. दोघांनाही सांगायचे की सतर्क राहा. आपल्या नावाने, त्यांच्या नावाने यामध्ये कुणीतरी घुसवतील आणि दंगली घडवतील. हकनाक आपली पोरे जातील, त्यांची पोरे जातील. तिकडेच लक्ष जाईल तुमचे. मूळ परिस्थितीकडे दुर्लक्ष करायला लावणे इतकाच कार्यक्रम आता सुरू आहे. आता देशाची परिस्थिती अत्यंत वाईट आहे, असा दावा ठाकरे यांनी केला. तसेच, पुण्यातील डीजे वादावर ठाकरे यांनी म्हटले की, पुण्यात आता जे सगळ सुरू आहे, डीजे वाजवायचा की नाही वगैरे, सगळे वाद सुरू आहेत. या विषयावरती मुख्यमंत्री काय बोलले, मला अजून नाही कळले. माझी बातमी जर चुकीची असेल तर नागपुरात डीजे बंद झाला, बाकी महाराष्ट्रामध्ये आहे. याच्यावरती मुख्यमंत्री सांगतात कायद्याने आम्हाला बंदी नाही आणता येत, मग नागपुरात कसे बंद झाले? याचे कारण तुम्ही डीजेच्या वादात गुंतता, डॉल्बीच्या वादात गुंतता, तुम्ही हेच बोलत राहा, सतत, बाकीच्या सगळ्या गोष्टींकडे तुमचे दुर्लक्ष होऊ देत, शिक्षण मिळते का? नाही मिळत, नोकऱ्या मिळतात का? नाही मिळत, नोकऱ्या मिळाल्या तर टिकणार की, नाही टिकणार माहित नाही, असेही ठाकरे यांनी म्हटले. राज ठाकरे म्हणाले की, नरेंद्र मोदी यांनी परदेशात जात भारतीयांना सांगितले की परदेशात जाऊ नका, सोनं खरेदी करू नका. देशाचा जीडीपी जर इतर देशापेक्षा जास्त असेल तर परदेशात जायचे का नाही? सोनं खरेदी का करायचे नाही? जेव्हा टंचाई असते तेव्हाच आपण पैसे वाचवतो. आर्थिक परिस्थिती खूप खराब झाली आहे. आज केवळ जेन झी रस्त्यावर आले. उद्या संपूर्ण देश रस्त्यावर येईल. तुम्हाला जातीयवाद, धार्मिक तेढ यामध्ये गुंतवायचे म्हणजे तुम्ही काही दुसरे बोलणार नाही. हे लोक पत्रकारांना बातम्याच देऊ देत नाहीत. म्हणून सोशल मीडियावर लोक व्यक्त होतात.

------------

### मराठा आंदोलकांचे थेट आ.

उपस्थित होते. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परिसरात काही काळ राजकीय वातावरणही तापले होते. मराठा समाजाच्या मागण्यांकडे शासनाने गांभीयार्ने पाहून आरक्षणाचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. शिंदे सेनेचे आ. बाबुराव कोहळीकर यांनी शासनस्तरावर समाजाच्या मागण्या मांडून त्यासाठी पाठपुरावा करावा, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली. तसेच आरक्षणाच्या मागणीची पूर्तता जोपर्यंत होत नाही तोपर्यंत आमदार व खासदारांच्या घरासमोर आंदोलन तीव्र करणार असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

--------------

### महावितरणचे ३२,६७९ कोटींचे

आता महावितरणच्या डोक्यावरील हे कर्ज थेट राज्य सरकारकडे हस्तांतरित करण्यात येणार आहे. विविध वित्तीय संस्थांना या कर्जाची परतफेड राज्य सरकारकडून केली जाणार आहे. या निर्णयामुळे महावितरणने दिलेली शासन हमी तसेच कर्जासाठी ठेवण्यात आलेले तारण मुक्त केले जाणार आहे. याशिवाय उच्चदाब वीज ग्राहकांकडून मिळणाऱ्या महसुलावर असलेला तारणाचा बोजाही कमी होणार आहे. त्यामुळे महावितरणच्या महसुलावर असलेला आर्थिक दबाव कमी होऊन कंपनीची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल, असे ऊर्जा विभागाचे सहसचिव नारायण कराड यांनी शुद्धीपत्रकात नमूद केले आहे. दरम्यान, राज्य सरकार महावितरणचे जेवढे कर्ज स्वीकारणार आहे, तेवढ्याच रकमेची शेतकऱ्यांच्या वीजबिलांची थकबाकी राज्य सरकारच्या खात्यात जमा करावी लागणार आहे. त्यामुळे महावितरणच्या आर्थिक पुनर्रचनेसोबत शेतकऱ्यांच्या वीजबिलांच्या थकबाकीचा प्रश्नही या निर्णयाशी जोडला गेला आहे. महावितरणचे हे कर्ज २०३६-३७ पर्यंत फेडण्याचे नियोजन आहे. तसेच विविध वित्तीय संस्थांकडून राज्य सरकारला उपलब्ध असलेल्या ७.५ टक्के प्राधान्य कर्जदराशी सुसंगत कमी व्याजदर मिळविण्यासाठी महावितरणने पाठपुरावा करावा, असे निर्देशही शासनाने दिले आहेत. कर्जाचा मोठा हिस्सा सरकारकडे हस्तांतरित झाल्याने महावितरणच्या ताळेबंदावरील कर्जाचा भार कमी होणार आहे. त्याचा परिणाम कंपनीच्या रोख प्रवाहावर आणि भविष्यातील कर्जउभारणीच्या क्षमतेवर होण्याची शक्यता आहे. मात्र, दुसरीकडे या कर्जाची दीर्घकालीन परतफेड आणि व्याजाचा मोठा भार राज्य सरकारला उचलावा लागणार असल्याने राज्याच्या आर्थिक व्यवस्थापनासमोरही मोठे आव्हान निर्माण होणार आहे.

--------------

### शिवसेनेच्या १७ पदाधिकाऱ्यांवर

आमदार राजेंद्र गावित यांचा मुलगा रोहित गावित यांचा समावेश आहे. रुग्णालयातील बिलिंग रिसेप्शनिस्ट विवेक बाबुलिंगा (२३) यांनी दिलेल्या तक्रारीवरून एफआयआर दाखल करण्यात आला. ही घटना रिलीफ हॉस्पिटलमध्ये पहाटेच्या सुमारास घडली. शिवसेनेच्या मध्यवर्ती कार्यालयाबाहेर आयोजित दहीहंडी कार्यक्रमात जखमी झालेल्या गोविंदांना उपचारासाठी येथे आणण्यात आले होते. या पाच रुग्णांचे एकूण वैद्यकीय बिल १९,८६६ रुपये झाले होते, ज्यापैकी १०,००० रुपये एका सहकाऱ्याने रोख स्वरूपात भरले होते. मात्र, उर्वरित रक्कम न भरताच रुग्णांना डिस्चार्ज देण्याची मागणी केल्याने वाद निर्माण झाला. पहाटे १:१५ च्या सुमारास, सांखे आणि घरत यांच्यासह १५-२० जण तातडीच्या उपचार विभागात शिरले. त्यांनी कर्तव्यावर असलेल्या डॉ. लिजोमोल यांना शिवीगाळ केली आणि रिसेप्शनिस्ट बाबुलिंगा यांच्या कानशिलात लगावली. त्यांनी आयसीयूमध्येही बळजबरीने प्रवेश केला. तसेच त्यांनी जखमी गोविंदांपैकी एकाला आयसीयूमधून बळजबरीने बाहेर काढले. या प्रकरणाचा तपास सुरू असून अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.

--------------

### आरक्षणाच्या कात्रीत

आरक्षणावर ५० टक्क्यांची कमाल मर्यादा घातली आहे. तामिळनाडूचा अपवाद वगळता ही मर्यादा ओलांडणे कायदेशीरदृष्ट्या अत्यंत आव्हानात्मक ठरते. त्यामुळे नवीन स्वतंत्र आरक्षण दिल्यास ते न्यायालयात टिकत नाही, आणि विद्यमान कोट्यात (ओबीसी किंवा एसटी) इतर समाजाचा समावेश केल्यास मूळ लाभार्थी समाज रस्त्यावर उतरतो. याच तांत्रिक आणि घटनात्मक समस्येमुळे सरकारची कोंडी झाली आहे. सध्या सर्वच समाज आपापल्या हक्कांवर ठाम असल्याने मुख्यमंत्र्यांसह संपूर्ण राज्य सरकारची अवस्था ''इकडे आड, तिकडे विहीर'' अशी झाली आहे. ११ सप्टेंबरच्या डेडलाईनपूर्वी शासन यावर कोणता सर्वसमावेशक तोडगा काढते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. यातच आता अंतरवाली सराटी येथे ओबीसी आरक्षण बचाव समितीचे ॲड. मंगेश ससाने विठ्ठल तळेकर, बाबा बटुळे यांच्यासह ओबीसी समाजाने उपोषण सुरू केले आहे. प्रामुख्याने पोलिसांनी हे उपोषण इतर ठिकाणी हलवण्याच्या सूचना केल्या मात्र त्यामुळे काही काळ तणाव निर्माण झाला होता. अशा परिस्थितीमध्ये महाराष्ट्र सरकार चांगलेच अडकले आहे. यातून मार्ग कसा काढला जातो याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. एक मात्र खरे आहे की, या आरक्षणाच्या खात्रीत राज्य सरकारची मात्र सुपारी झाल्याची दिसत आहे.

-----------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. ०७ सप्टेंबर २०२६



## थोडक्यात

### निवासी मतिमंद विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

वासनवाडीफाटा, शिंदे नगर, बीड येथील निवासी मतिमंद विद्यालयात भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालयातील विशेष दिव्यांग विद्यार्थ्यांनी आपल्या विशेष शिक्षकांचा गुलाबपुष्प देऊन सन्मान करत कृतज्ञता व्यक्त केली.



विशेष दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांसोबतच विद्यालयातील मनसोपचारतज्ञ, परिचारिका, सेवक, काळजीवाहक, सफाईगार, पहारेकरी, मदतनीस व स्वयंपाकी हे कर्मचारीही महत्त्वाची भूमिका बजावत असतात. विद्यार्थ्यांची विशेष काळजी घेणाऱ्या तसेच विद्यालयातील दैनंदिन व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी योगदान देणाऱ्या या सर्व कर्मचाऱ्यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास विश्वध्रुप फाउंडेशनचे सहसचिव मनीषभैय्या शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक शिंदे सर, काळे सर, अबुज सर, हगारे सर, डिसले सर, येवले सर, डोंगरे सर, हिंगे सर,लांगोरे सर, खरसाडे मॅडम, जगताप मॅडम, चव्हाण मॅडम, बचाटे मॅडम, रसाळ सर, सावंत सर, आझडे सर, राठोड मॅडम, सुलभाताई कापसे,नंदाताई पारधी, बालू हाडुळे, रमेश कापसे, प्रवीण ठोकरे, चिंतामण शिंदे, अण्णा गायकवाड, गणेश महाकुडे, उमेश चव्हाण, पवार सर,आशाताई कारगुडे, उषाताई गव्हाणे, वनिताताई पायाळ, जयाताई कुटे आदी उपस्थित होते.विशेष विद्यार्थ्यांनी शिक्षक व कर्मचाऱ्यांचा केलेला हा सन्मान कार्यक्रमातील भावनिक आणि प्रेरणादायी क्षण ठरला.



### योगेश्वरी पॉलिटेक्निकमध्ये करिअर मार्गदर्शनासाठी विशेष सेमिनार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित, कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक, अंबाजोगाई येथे शिक्षक दिनानिमित्त ऑटोमोबाईल व मेकॅनिकल विभागातील विद्यार्थ्यांच्या करिअर मार्गदर्शनासाठी प्रसिद्ध अभियंते मा. देवदत्त गोपाळराव चौसाळकर (Executive Project Manager - Cummins Technologies) यांच्या विशेष सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष मा.गणपत व्यास उपस्थित होते. सुरुवातीला या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पॉलिटेक्निकचे प्राचार्य रमण देशपांडे यांनी केले.

चौसाळकर यांनी पॉलिटेक्निक शिक्षणानंतर विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध विविध संधींबद्दल,विशेषतः डिग्री इंजिनिअरिंग, उद्योग क्षेत्रातील नोकरीच्या संधी, उद्योजकतेच्या संधी व करिअर नियोजन याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांनी बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात – ींळषळलळरश्र खपींशश्रश्रळसशपलश, ऊरीं डलळशपलश, ठेलेींळली यांसारख्या आधुनिक क्षेत्रांमध्ये कौशल्य विकसित करणे आवश्यक असल्याचे सांगितले.या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना पॉलिटेक्निकनंतरच्या विविध शिक्षण व करिअर संधींबाबत महत्त्वपूर्ण दिशा मिळाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ऑटोमोबाईल विभाग प्रमुख प्रा. बप्पासाहेब सोनवणे यांनी केले. यावेळी यंत्र अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा. शाम गडदे व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# वाकलेल्या विद्युत खांबामुळे ऊस पिकाला धोका

## तक्रारीनंतरही महावितरणकडून दुर्लक्ष; मनूर शिवारातील ११ के.व्ही. विद्युत तारा ऊस पिकाला भिडल्या

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मनूर शिवारात वाकलेल्या विद्युत खांबामुळे शेतकऱ्यांच्या जीवितासह उभ्या ऊस पिकाला गंभीर धोका निर्माण झाला आहे. शेतातून गेलेल्या ११ के.व्ही. विद्युत वाहिनीचा खांब मोठ्या प्रमाणात वाकला असून, त्यावरील विद्युत तारा थेट उभ्या ऊस पिकाला घासत असल्याने सतत स्पार्किंग होत असल्याचा प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, याबाबत संबंधित विभागाकडे वारंवार तक्रार करून तसेच पाठपुरावा करूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

मनूर शिवारातील गट क्रमांक ८१ मध्ये शेतकरी गोविंद रामप्रसाद गोपाळ यांची सुमारे ०० हे. ९५ आर शेतजमीन असून या शेतात सध्या ऊसाचे उभे पीक आहे. या पिकाची अंदाजे तीन लाख रुपये किंमत असल्याचे शेतकऱ्याने दिलेल्या अर्जात नमूद केले आहे. मात्र, शेजारील गट क्रमांक ८२ मधील विद्युत खांब मोठ्या प्रमाणात वाकल्याने त्यावरील विद्युत तारा त्यांच्या शेतातील ऊस पिकाच्या अगदी जवळून व काही ठिकाणी पिकाला स्पर्श करत आहेत.

ऊस पिकाला विद्युत तारांचा सतत संपर्क होत असल्याने स्पार्किंग होण्याचे प्रकार घडत आहेत. ऊस हे ज्वलनशील पीक असल्याने एखादी ठिणगी पडल्यास संपूर्ण ऊस पिकाला आग लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान होण्याबरोबरच शेतात काम करणाऱ्या शेतकरी व मजुरांच्या







जीवितालाही धोका निर्माण झाला आहे.

या गंभीर प्रकाराबाबत शेतकऱ्याने महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करून व प्रत्यक्ष पाठपुरावा करून विद्युत खांब तातडीने सरळ करावा तसेच विद्युत तारा सुरक्षित उंचीवर ताणून घ्याव्यात, अशी मागणी केली आहे. मात्र, वारंवार पाठपुरावा करूनही संबंधितांकडून ठोस प्रतिसाद मिळत नसल्याचा आरोप शेतकऱ्याने केला आहे. तक्रार करूनही प्रत्यक्ष दुरुस्तीचे काम झाले नसल्याने परिस्थिती जैसे थेच आहे.

विद्युत तारा पिकाला घासत असताना स्पार्किंग होत असल्याने भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. एखादी दुर्घटना घडून जीवित अथवा वित्तहानी झाल्यानंतरच महावितरण प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

शेतकऱ्याने दिलेल्या अर्जात, दुर्घटना होण्यापूर्वीच वाकलेला विद्युत खांब सरळ करून विद्युत तारा सुरक्षित उंचीवर ताणून घेण्यात याव्यात, अशी मागणी केली आहे. तसेच भविष्यात या वाकलेल्या खांबामुळे किंवा विद्युत तारांमुळे कोणतीही दुर्घटना घडल्यास अथवा पिकाचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी महावितरण प्रशासनाची राहील, असेही अर्जात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, शेतकऱ्याने आपल्या तक्रारीसोबत घटनास्थळावरील वाकलेल्या विद्युत खांबाचे छायाचित्र व ७/१२ उतारा जोडला असून, महावितरणने या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेऊन दुर्घटना होण्यापूर्वी विद्युत खांब व तारांची दुरुस्ती करावी, अशी मागणी होत आहे.

# ना. पंकजाताई मुंडे यांनी शिक्षकदिनी शिक्षकांविषयी व्यक्त केली कृतज्ञता !

## परळीच्या शालेय जीवनातील आठवणींना दिला उजाळा ; शुभेच्छाने शिक्षकही भारावले !

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

एखादा व्यक्ती कितीही उच्च पदावर पोहोचला तरी तो आपलं गांव, आपली शाळा व तिथल्या गुरूजनांना विसरत नाही, शालेय जीवनातील आठवणींची शिदोरी त्याच्याकडे असतेच, त्याला राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे तरी कशा अपवाद ठरतील? शिक्षक दिनाचे औचित्य साधून आज त्यांनी व्यस्त कार्यक्रमातून वेळ काढून आपल्या शाळेतील शिक्षकांविषयी कृतज्ञतेच्या भावना व्यक्त केल्या.



ना. पंकजाताई मुंडे यांचे दहावी पर्यंतचे शिक्षण शहरातील सरस्वती विद्यालयात झाले. त्यांना अध्यापन करणारे जवळपास सर्वच शिक्षक सेवानिवृत्त झाले आहेत. ज्यांच्या ज्ञानाचा आणि मार्गदर्शनाचा उपयोग करून आपण यशाचा पल्ला गाठला त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे आपले कर्तव्य आहे अशी प्रामाणिक भावना ठेवून त्यांनी आजच्या शिक्षकदिनी त्यांचा सत्कार केला. त्यांच्या सूचनेनुसार ना. पंकजाताईंचे वर्गमित्र प्रीतेश तोतला, सचिन गिते, पवन मोदाणी, मोहन जोशी तसेच राहूल केंद्रे, स्वीय सहाय्यक अमित गिरडे यांनी ना. पंकजाताई मुंडे यांचे शिक्षक सर्वश्री नानासाहेब कवडे, शिवशंकर देशमाने, शंकरआप्पा मोगरकर, सुभाष नानेकर, वनमालाताई टाले, सरलाताई बजाज यांच्या घरी जाऊन ना. पंकजाताई मुंडेंच्या वतीने त्यांचा सत्कार केला तसेच कृतज्ञतेचे पत्र दिले. आपली विद्यार्थीनी राज्याची मंत्री असून सुद्धा वेळात वेळ काढून आपली आठवण केली व आपला सत्कार केला हे पाहून शिक्षकांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले.

पान ६ वरुन...

### ढेकनमोहा तांडा तलावातील

काही ठिकाणी लघुतलावातून विद्युत मोटारीच्या सहाय्याने अनधिकृतपणे पाणी उपसा होत असल्याची बाब प्रशासनाच्या निदर्शनास आली होती . त्यानुषंगाने तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी संबंधित यंत्रणेला तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले . त्यानुसार महसूल विभाग व पोलिस प्रशासनाच्या पथकाने प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन पाहणी केली आणि लघुतलावातून पाणी उपसा करण्यासाठी लावण्यात आलेल्या विद्युत मोटारी व संबंधित साहित्य काढून टाकले. या कारवाईमध्ये पी . एस . आंधळे , मंडळाधिकारी , नाळवंडी , जावेद शेख , तलाठी , ढेकनमोहा , ओंकार गायके , तलाठी यांच्यासह पोलिस प्रशासनाचे पोलीस उपनिरीक्षक दिलीप थोरवे , पोलीस हेडकॉन्स्टेबल संजय बांगर , चालक गरजे , होमगार्ड भोसले , शेलार , राऊत , रहाडे यांनी सहभाग घेतला . महसूल व पोलिस प्रशासनाच्या समन्वयातून करण्यात आलेल्या या कारवाईदरम्यान लघुतलाव परिसराची पाहणी करून अवैध पाणी उपशासाठी वापरण्यात येणाऱ्या विद्युत मोटारी काढण्यात आल्या . कारवाईच्या वेळी ढेकनमोहा येथील सरपंच बंडू गाडीवान , ढेकनमोहा तांडा येथील सरपंच दयाराम पवार , बाबू कारंडे , तांडा उपसरपंच बाजीराव पवार , बाळू भोगे , मानशींग पवार , ओमकार खवतड , नयनसिंग ठाकूर , आशोर पवार , शिवा पवार , राजू पवार , वैभव खवतड , शिवहार खवतड , अंकुश पवार तसेच ग्रामसेवक , पोलीस पाटील आदी उपस्थित होते.

### पाटोदा नगरपंचायतीचा फोल

भीषण उन्हाळा कसा काढायचा, या विचाराने नागरिक भयभीत झाले आहेत. आजपर्यंत नागरिक शांत राहिले आणि नगरपंचायतीच्या पोकळ आश्वासनांवर विश्वास ठेवत गेले, म्हणूनच नगरपंचायतीचे फावले आहे.

आता नगरपंचायतीविरोधात जनआक्रोश आणि उठाव!

आजवरच्या सर्वच अपयशी ठरलेल्या पाणी योजनांची आणि झालेल्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. केवळ निवेदने देऊन हा प्रश्न सुटणार नसून, नगरपंचायतीच्या या निष्क्रिय कारभाराविरोधात संपूर्ण पाटोदा शहराला आता एकत्र येऊन 'तीव्र उठाव' करावाच लागेल. जोपर्यंत नागरिक रस्त्यावर उतरून नगरपंचायतीला जाब विचारत नाहीत, तोपर्यंत शहराला कायमस्वरूपी पाणी मिळणार नाही, असा थेट इशारा पाटोदा शहरातील नागरिकांनी दिला आहे.

### बैलपोळ्याच्या निमित्ताने युसूफवडगावचा

लक्ष वेधून घेत आहे.

महागाईची झळ, तरी बैलांच्या सजावटीत काटकसर नाही

सध्या जीवनावश्यक वस्तूंसह सर्वच वस्तूंच्या किमती वाढल्याने बैलपोळ्याच्या साहित्याच्या दरातही वाढ झाली आहे. त्यातच पावसाने पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. मात्र, महागाई आणि दुष्काळाचे सावट असतानाही बैलांप्रती असलेले प्रेम कमी झालेले नाही. आपल्या कष्टकरी साथीदारांना पोळ्याच्या दिवशी थाटामाटात सजविण्यासाठी शेतकरी आवश्यक साहित्याची खरेदी करत आहेत.एकीकडे पावसाअभावी पिकांची चिंता, तर दुसरीकडे महागाईची झळ अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे. तरीही भारतीय संस्कृतीतील परंपरा जपण्यासाठी आणि वर्षभर शेतात साथ देणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बैलपोळा उत्साहात साजरा करण्याची तयारी युसूफवडगाव परिसरात सुरू झाली आहे.

### राजे ९० कोटीच्या

तलाठी यांची नेमणूक करण्यात आली होती. काही वाहनांच्या ठेकेदारांना ही वाळू पोहोच करण्याची जबाबदारी देण्यात आली होती. वाळू घाटावरून निघाल्यानंतर त्याची माहिती संबंधित तहसीलदारांना व्हाट्सअप च्या माध्यमातून दिली जात होती. ही वाळू योग्य ठिकाणी पोहोच करण्याची जबाबदारी संबंधित तहसीलदारांची होती. आणि संबंधित तहसीलदारांनी नेमलेल्या यंत्रणेची होती. या वाळूच्या पोहोचसाठी एक ओटीपी दिला जायचा. हा ओटीपी वाहनधारक परस्पर घेऊन वाळू टाकायचे ही जबाबदारी त्यांच्यावरच होती. अशा परिस्थितीमध्ये मोठ्या प्रमाणात वाळू उपसा करून ती संबंधित घरकुलधारकांना पोहोच झाली नाही अशी मोठी ओरड घरकुलधारकांमध्ये होती. मग ही वाळू नेमकी गेली कुठे? असा प्रश्न निर्माण झाला आणि याचा संपूर्ण ठपका तहसीलदार खोमणे यांच्यावर ठेवण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयातून अप्पर जिल्हाधिकारी धार्मिक यांनी याची चौकशी केली. मात्र यातून काय निष्पन्न झाले हे मात्र समजू शकले नाही. हे प्रकरण शमवण्यासाठी मंडळ अधिकारी, तलाठी दर्जाच्या कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करून हे प्रकरण तिथेच थांबले. संपूर्ण गेवराई करांची तहसीलदार खोमणेवर कारवाई करावी अशी मागणी होती. त्यासाठी मोर्चा आणि उपोषणे ही झाली मात्र याचे पुढे काय झाले हे समजले नाही. या प्रकरणातून अनेक प्रश्न निर्माण झाले हे आंदोलन चालू असतानाच गेवराई विधानसभेचे आमदार विजयसिंह पंडित यांनी या प्रकरणाचा आपण छडा लावल्याशिवाय राहणार नाही अशी भीम गर्जना केली. प्रसंगी हा प्रश्न विधानसभेत उपस्थित करू असे त्यांनी ठासून सांगितले. आणि वेळ पडली तर न्यायालयात जाऊ असेही ते वारंवार सांगत होते. मात्र कालांतराने हा प्रश्न कायमचा संपला. विजय राजे ना विधानसभेत बोलले, नाही न्यायालयात गेले. नेमके पुढे काय झाले असा संशय गेवराईकरांना येत आहे. खोमणे जर दोषी होते तर त्यांच्यावर कारवाई होणे अपेक्षित होते. मात्र खोमणेवर कारवाई करण्याची हिंमत जिल्हाधिकाऱ्यांनीही दाखवली नाही याचे नेमके गोड बंगाल काय? असा प्रश्न उपस्थित होतो. खोमणे हे एका मोठ्या नेत्याचे जवळचे असल्याचे बोलले जात होते. हे नेते नेमके कोण याबद्दलही स्पष्टपणे कोणी बोलले नाही आणि हे प्रकरण संपले. मग नेमकी वाळू गेली कुठे आणि चार घाटावरून आठ हजार ब्रास वाळू निघणे अपेक्षित असताना ही दोनशे ब्रास वाळू आली कुठून? हा ही मोठा प्रश्न या प्रकरणात उपस्थित होतो. शेवटी घरकुलधारकांना न्याय देणे ही लोकप्रतिनिधी जबाबदारी होती. मात्र त्यांनी भीमगर्जना करूनही ती का टाळली याबद्दलही नागरिकांच्या मनात संशय निर्माण होत आहे.

### आ.सुरेश धस आणि देविदास धस यांच्या

अहवाल तसेच उपविधी दुरुस्ती यांसह महत्त्वपूर्ण विषयांवर निर्णय घेतले.सभेपुढील विषयपत्रिकेनुसार, प्रारंभी मागील सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम केला. त्यानंतर सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल, तेरीज पत्रक,नफा - तोटा पत्रक व ताळेबंद पत्रकास मंजुरी देण्यात आली.२०२५- २०२६ अखेर झालेल्या नफा वाटणीस मान्यता दिली आणि आगामी सन २०२६-२०२७ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्याबाबत चर्चा झाली. याशिवाय सभेत लेखापरीक्षण अहवाल वाचन व दुरुस्ती सुचविली,संचालक मंडळाने राजीनामे मंजूर करून कमी झालेले व नव्याने दाखल करून घेतलेल्या सभासदांना मान्यता दिली.सन २०२६-२०२७ साठी लेखापरीक्षकांच्या नेमणुकीस मान्यता दिली.संस्थेच्या उपविधी दुरुस्तीस मंजुरी दिली.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर विचारविनिमय करण्यात आला.

# इरा इंटरनॅशनल स्कूलमध्ये चिमुकल्यांचा दहीहंडीचा जल्लोष!

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील इरा इंटरनॅशनल स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी व गोपाळकाला उत्सवाचे औचित्य साधून चिमुकल्या बालगोपालांनी दहीहंडी फोडत उत्साहाचा जल्लोष केला. राधा-कृष्णाच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कलाविष्कारांनी शाळेचा परिसर भक्तिमय आणि उत्साहपूर्ण झाला होता.



जन्माष्टमीच्या निमित्ताने अनेक विद्यार्थी आकर्षक राधा-कृष्णाच्या वेशभूषेत शाळेत दाखल झाले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी विविध गाण्यांच्या तालावर टिपऱ्या खेळत वातावरणात रंग भरला. त्यानंतर काही विद्यार्थ्यांनी राधा-कृष्णाच्या गीतांवर मनमोहक नृत्य सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली.

त्यानंतर चिमुकल्या गोविंदांनी एकत्र येत मानवी मनोरा रचला आणि एकमेकांच्या खांद्यावर उभे राहत दहीहंडी फोडली. दहीहंडी फुटताच विद्यार्थ्यांनी टाळ्यांचा कडकडाट आणि जल्लोष करत आनंद व्यक्त केला.या कार्यक्रमास शाळेचे प्राचार्य बापुसाहेब भुसारी, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे इरा इंटरनॅशनल स्कूलमध्ये जन्माष्टमीचा सोहळा मोठ्या आनंदात आणि उत्साहात साजरा झाला.

# नित्य सराव, अभ्यास आणि जिद्दीच्या जोरावर धम्मशील वाघमारे यांची यशस्वी भरारी

## धर्मदाय आयुक्त कार्यालय बीड येथे निरीक्षक पदी नियुक्ती

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील चिंचगव्हाण येथील रहिवाशी, कोषागार कार्यालय धारूर येथील कर्मचारी परमेश्वर तुकाराम वाघमारे यांचे चिरंजीव धम्मशील परमेश्वर वाघमारे यांची धर्मदाय आयुक्त कार्यालय बीड या ठिकाणी निरीक्षक पदी नियुक्ती झाली आहे. त्याच्या या यशाने कुटुंबीय मित्रपरिवार आणि परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



धम्मशील वाघमारे याने आपले ध्येय साध्य करण्यासाठी कठोर मेहनत घेत सातत्याने अभ्यास व नियमित सराव केला. परिस्थिती कशीही असो ध्येयापासून विचलित न होता त्याने प्रयत्न सुरूच ठेवले आणि याचा प्रत्यय त्याच्या या यशातून साध्य झाला. धम्मशील याने कठोर मेहनत करत व सातत्यपूर्ण अभ्यास केल्याने अखेर धर्मदाय आयुक्त कार्यालय बीड या ठिकाणी निरीक्षक पदी त्याची निवड झाली. त्याच्या या नियुक्तीमुळे कुटुंब मित्रपरिवार आणि परिसराचा नावलौकिक वाढला आहे.आजच्या या स्पर्धेच्या युगात अनेक तरुण मोठमोठी स्वप्न पाहत असतात परंतु जे तरुण सातत्याने अभ्यास व कठोर सराव करतात तेच तरुण ध्येयापर्यंत पोहोचतात. धम्मशील वाघमारे यांचा संघर्ष आणि यश हे तरुणांसाठी 'मेहनतीशिवाय पर्याय नाही' हा संदेश देणारे आहे.त्याने मिळवलेल्या या यशाबद्दल कुटुंबीय, मित्रपरिवार, हितचिंतक व परिसरातील नागरिकांकडून त्याच्यावर अभिनंदनचा वर्षा होत असून त्याला त्याच्या पुढील प्रशासकीय सेवेतील वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# परमेश्वर जे देतो त्यात कल्याण, जे देत नाही त्यात आणखी कल्याण; हीच खरी भक्ताची दृष्टी!

आष्टी । प्रतिनिधी

सामान्य माणूस आपल्या जीवनाकडे, संसाराकडे मर्यादित नजरेने पाहत असतो. आपल्याला जीवनाच्या विशाल सागराची कल्पना नसते; परंतु संतांची दृष्टी सागरासारखी अथांग असते. त्यांना भूत, भविष्य आणि वर्तमान या सर्वांचा परिचय असतो. त्यामुळे संतांच्या दृष्टीने पाहिल्यास, 'परमेश्वर आपल्याला जे देतो त्यात आपले कल्याण असते आणि परमेश्वर जे आपल्याला देत नाही त्यात आपले आणखी मोठे कल्याण असते', हीच खरी भक्ताची दृष्टी असली पाहिजे. या भावातून प्रपंचातील वस्तूंचा अहंकार आणि न मिळालेल्या गोष्टींचा लोभ गळून पडतो, तेव्हाच माणूस जिवंतपणी मुक्त होतो, असे ओजस्वी प्रतिपादन विख्यात शिवकथाकार प.पू.समर्थ भक्त मंदार महाराज रामदासी यांनी केले. पवित्र श्रावण मासाचे औचित्य साधून अहिल्यानगरातील ऐतिहासिक गंजबाजार (गांजेगल्ली) येथे सुमित संतोष वर्मा व शिवमित्र प्रतिष्ठानच्या वतीने २ ते ६ सप्टेंबर दरम्यान भव्य 'शिव महापुराण श्रावण कथा' महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.या ज्ञानयज्ञाच्या चौथ्या दिवशी भाविकांना शिवकथेचे अमृतपान करून देताना मंदार महाराज बोलत होते. 'शिवकथा हीच शिवभक्तांची श्रद्धा आणि शिवनाम हीच जीवनाची साधना' या भावनेने आयोजित या सोहळ्यास अहिल्यानगर शहर व परिसरातील शिवभक्त, महिला आणि तरुणांनी गर्दी केली होती.

संकल्पाने विश्वाची आणि शिवपुत्राची निर्मिती

कथेत पुढे बोलताना मंदार महाराजांनी ईश्वराच्या संकल्पशक्तीचे रहस्य उलगडले.हे अथांग विश्व परमात्म्याच्या केवळ संकल्पातून निर्माण झाले आहे.ब्रह्मदेवाने विश्वातील पहिले मानवी दांपत्य 'स्वायंभुव मनु

**शिवमहापुराण कथेत भाविकांना मार्गदर्शन करताना प.पू. समर्थ भक्त मंदार महाराज रामदासी**

**अहिल्यानगरात शिवमहापुराण श्रावण कथेस भाविकांची अलोट गर्दी; प.पू. मंदार महाराज रामदासी यांचे विचार**

आणि शतरूपा' यांना संकल्पानेच उत्पन्न केले. ईश्वराला काहीही निर्माण करण्यासाठी बाह्य साधनांची गरज भासत नाही, त्याच्या संकल्पातूनच प्रकटीकरण होते असे सांगत त्यांनी भगवान शिव व माता पार्वती यांच्या संकल्पाची आणि कार्तिकेय जन्माची कथा मांडली.यावेळी कार्तिक स्वामीची जन्मकथा सांगीतली.शिवतेज ते षडानन अवतारतारकासुराच्या त्रासाने त्रस्त झालेल्या समस्त देवतांनी शिव-पार्वतीच्या मिलनातून पुत्राची मागणी केली होती. देवतांच्या आर्त हाकेमुळे भगवान शंकरांनी आपल्या समाधीतून बाहेर येऊन पुत्राच्या संकल्पाचे अलौकिक तेज बाहेर काढले. शास्त्रात अग्नीला 'देवतांचे मुख' मानले गेले असल्याने सर्वप्रथम अग्नीने ते शिवतेज ग्रहण केले; परंतु त्या तेजाचा प्रचंड दाह सर्व देवांना असह्य झाला.त्यानंतर पवित्र जलाशयात स्नान करणाऱ्या सप्तर्षींच्या पत्नींपैकी सहा ऋषीपत्नींनी (वशिष्ठपत्नी अरुंधती माता वगळून) थंडीपासून बचावासाठी त्या तेजरूपी अग्नीचा आश्रय घेतला. परिणामी, ते शिवतेज त्यांच्यामध्ये प्रविष्ट झाले.त्यांनाही तो दाह सहन न झाल्याने त्यांनी हिमालयावर ते तेज उत्सर्जित केले.हिमालयाने ते गंगेच्या प्रवाहात सोडले आणि गंगेच्या लाटांनी ते तेज सरकंड्याच्या (शरवण) पवित्र वनात नेऊन प्रस्थापित केले. तेथे मार्गशीर्ष शुद्ध षष्ठीच्या शुभदिनी एका दिव्य बालकाचे प्रकटीकरण झाले. तेच कार्तिकेय (स्कंद / षडानन) म्हणून ओळखले गेले, ज्यांनी पुढे देवसेनेचे सेनापती होऊन असुरांचा संहार केला.

देवतांना शाप आणि संसारात संततीचे गूढ

पुत्रप्राप्तीच्या सुखापासून वंचित राहिलेल्या माता पार्वतीने देवतांना तुमच्या पत्नींना संतती होणार नाही असा शाप दिला.या प्रसंगाचे तात्त्विक विश्लेषण करताना मंदार महाराज म्हणाले, देव अमर आहेत, त्यामुळे त्यांना वंश वाढवण्याची गरज नसते.नश्वर देह धारण करणाऱ्या माणसाला मात्र आपण मृत्यूनंतरही जिवंत राहावे, या अमरत्वाच्या सुप्त भुकेपोटी संततीची तीव्र ओढ असते. परंतु, ज्याला 'मी नश्वर शरीर नसून अमर आत्मा आहे' या आत्मज्ञानाचा दृढ बोध होतो, त्याच्यासाठी संतती असणे किंवा नसणे ही उणीव राहत नाही. ईश्वराच्या इच्छेत समाधान मानणे आणि त्याच्या अनुसंधानात जगणे हाच खरा भक्तीमार्ग आहे.

कथेदरम्यान सादर झालेल्या विविध स्तोत्रे, शिवनामाचा गजर आणि भक्तिमय निरूपणाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले होते. शेवटी महाआरती करून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

प्रपंचात जे मिळाले त्याचा अहंकार न बाळगणे आणि जे मिळाले नाही त्याचा लोभ न धरणे,यातच भक्तीचे मर्म सामावलेले आहे. अनेकदा जीवनात झालेली अवकृपा हीच खरी भगवंताची परमकृपा असते.

विश्वाच्या निर्मितीपासून आजवर कोणत्याही जिवाकडून असे कोणतेही पाप घडलेले नाही, जे भगवान महादेवांच्या कृपेने नष्ट होऊ शकत नाही.प्रारब्धापेक्षा भगवंताची कृपा आणि भक्तीची ताकद नेहमीच श्रेष्ठ असते. माणूस संततीच्या रूपात जगात शिल्लक राहू पाहतो; मात्र आत्मज्ञानाची प्राप्ती झाली की मरणधर्माच्या पलीकडील अजरामर स्वरूपाची ओळख पटते आणि सर्व चिंतांचा अंत होतो.

cmyk

# जनावरांचा मृत्यू झाल्यास सरकारकडून मिळणार ८५ टक्के विमा भरपाई

## पशुधन विमा भरपाई योजनेत शेतकऱ्यांचा वाढता सहभाग

पुणे : राज्य सरकारने शेतकरी आणि पशुपालकांसाठी पशुधन विमा भरपाई योजना सुरू केली आहे. केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत पशुधनाला आजार, अपघात आणि नैसर्गिक आपत्तींपासून आर्थिक संरक्षण मिळावे, या उद्देशाने ही योजना राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत दुधाळ गाय व बैलांसाठी कमाल ७० हजार रुपये, दुधाळ म्हैस व रेड्यासाठी कमाल ८० हजार रुपये, तर शेळी आणि मेंढीसाठी कमाल ७० हजार रुपयांपर्यंत विमा संरक्षण दिले जाते.

या योजनेत पूर, वीज पडणे, अपघात, विषबाधा किंवा इतर कारणांमुळे पशुधनाचा अनैसर्गिक मृत्यू झाल्यास, पात्र पशुपालक आणि शेतकऱ्यांना विम्याच्या माध्यमातून आर्थिक मदत मिळते. त्यामुळे पशुधनाच्या नुकसानीच्या प्रसंगी पशुपालकांना आर्थिक आधार मिळण्यास मदत होणार आहे. तसेच, या योजनेत विमा प्रीमियमचा दर एक वर्षासाठी ४.३० टक्के, दोन वर्षांसाठी ७.५० टक्के आणि तीन वर्षांसाठी १०.५० टक्के निश्चित करण्यात आला आहे. विमा प्रीमियममध्ये सरकारकडून ८५ टक्के अनुदान दिले जाते. त्यामध्ये केंद्र सरकारचा ५१ टक्के आणि राज्य सरकारचा ३४ टक्के वाटा असतो. त्यामुळे लाभार्थ्याला केवळ १५ टक्के प्रीमियम भरावा लागणार आहे.



योजनेचे उद्दिष्ट : पशुधन अचानक दगावल्यास होणाऱ्या आर्थिक नुकसानीपासून पशुपालकांना किंवा शेतकऱ्याला संरक्षण देणे, त्यांना कर्जबाजारीपणापासून वाचवणे आणि पशुधन उत्पादनवाढीस प्रोत्साहन देणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

योजनेचे फायदे : अपघात, नैसर्गिक आपत्ती, आजारपण तसेच नैसर्गिक मृत्यू यामुळे होणाऱ्या नुकसानीपासून संरक्षण मिळते. सरकारकडून तब्बल ८५ टक्के अनुदान मिळते. यात केंद्राचा वाटा ५१ टक्के तर राज्याचा वाटा ३४ टक्के असतो. त्यामुळे लाभार्थीला त्यापैकी फक्त १५ टक्के प्रीमियम भरावा लागणार आहे.

योजनेच्या अटी व पात्रता : लाभार्थ्याच्या इच्छेनुसार १, २ किंवा ३ वर्षांचा विमा कालावधी निवडता येतो. विमा कालावधीनुसार १ वर्षासाठी ४.३० टक्के, २ वर्षांसाठी ७.५० टक्के आणि ३ वर्षांसाठी १०.५० टक्के प्रीमियम दर लागू आहे. प्रत्येक कुटुंबातील जास्तीत जास्त १० पशुधनांचा विमा उतरवता येतो. पशुधनाच्या कानातील १२ अंकी इअर टॅग क्रमांकाची एनडीएलएम प्रणालीमध्ये नोंदणी असणे आवश्यक आहे. विमा काढण्यासाठी संबंधित पशुधनाची एनडीएलएम प्रणालीमध्ये नोंदणी असणे बंधनकारक आहे. विमाधारक पशुधनाचा मृत्यू झाल्यास २४ तासांच्या आत विमा कंपनीला कळवून दावा म्हणजेच क्लेम दाखल करणे आवश्यक आहे. देशी किंवा संकरित दुधाळ गायी, म्हशी, बैल, रेडे, शेळ्या आणि मेंढ्या यांचे मालक असलेले पशुपालक या योजनेचा लाभ घेऊ शकतात. वरील पात्र पशुधनाचे मालक शेतकरी व पशुपालक या योजनेअंतर्गत विमा संरक्षणासाठी पात्र आहेत.

योजनेची कागदपत्रे : आधार कार्ड, बँक पासबुक, पशुधनाचे फोटो, लसीकरण प्रमाणपत्र, नोंदणीकृत पशुवैद्यकाचे आरोग्य प्रमाणपत्र. अर्ज प्रक्रिया : आपल्या तालुक्यातील पशुसंवर्धन कार्यालयाशी किंवा जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा. पशुधनाचा इअर टॅग क्रमांक एनडीएलएम प्रणालीत नोंदणीकृत असल्याची खात्री करावी. आवश्यक कागदपत्रे सादर करावीत (आधार, बँक पासबुक, फोटो, आरोग्य प्रमाणपत्र इ.) निवडलेल्या कालावधीनुसार १/२/३ वर्षे प्रीमियमपैकी १५ टक्के रक्कम भरावी. दुर्दैवाने पशुधनाचा मृत्यू झाल्यास २४ तासांच्या आत विमा कंपनीला कळवून दावा दाखल करावा सर्व कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर अनुदान मिळेल.

## पॉलिहाउस अनुदानाच्या नव्या नियमांना विरोध



पुणे / प्रतिनिधी

कर्ज काढून आणि स्वतःचे भांडवल गुंतवून पॉलिहाउस, शेडनेट हाउस उभारणी सुरू केलेल्या शेतकऱ्यांवरच राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या (एनएचबी) नव्या नियमांचा बोजा पडण्याची शक्यता आहे. जाहीर केलेल्या नवीन मार्गदर्शक तत्त्वांची पूर्वसंमतीने अंमलबजावणी करू नये. पूर्वीच्या नियमांनुसार परवानगी मिळून आर्थिक बांधिलकी स्वीकारलेल्या प्रकल्पांना जुन्या निकषांनुसारच अनुदान द्यावे, अशी मागणी संरक्षित शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, मागील सहा ते आठ महिन्यांत अनेक प्रकल्पांना एनएचबीकडून पूर्वपरवानगी मिळाली आहे. त्यानंतर संबंधितांनी बँकांकडून कर्ज घेतले, स्वतःचे भांडवल उभे केले आणि प्रत्यक्ष उभारणीला सुरुवात केली. प्रकल्पाच्या सुरुवातीच्या टप्प्यात मोठी गुंतवणूक झालेली असताना नियम बदलल्यास या शेतकऱ्यांना अनुदानापासून वंचित राहण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे पूर्वपरवानगीपासून पुढील सर्व प्रक्रिया पूर्ण केलेल्या प्रकल्पांना जुन्या नियमांचे संरक्षण द्यावे, अशी मागणी आहे. पूर्वी अर्ज केलेले, मंजुरी मिळालेले, अनुदानाचे दावे दाखल केलेले किंवा संयुक्त पाहणी पूर्ण झालेले प्रकल्प जुन्या ५० टक्के अनुदानाच्या निकषात आणावेत. नव्या मार्गदर्शक तत्त्वांतील 'हिंदू अविभक्त कुटुंब' आणि 'एक कुटुंब-एक अनुदान' या अटी रद्द कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. कुटुंबातील एखादी व्यक्ती सरकारी सेवेत असल्यास किंवा दहा हजार रुपयांपेक्षा अधिक पेन्शन घेत असल्यास इतर सदस्यांना अनुदान नाकारू नये. अनुदानाची कमाल मर्यादा आणि ५० टक्के अनुदानाची तरतूदही कायम ठेवावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. नव्या अटींमुळे परिसरातील जवळपास ९० टक्के शेतकरी अनुदानाच्या कक्षेबाहेर जाण्याची शक्यता असल्याचा दावा शेतकरी प्रतिनिधींनी केला आहे. कर्ज घेऊन प्रकल्प उभारलेल्या शेतकऱ्यांना अनुदान न मिळाल्यास कर्जफेडीचा गंभीर प्रश्न निर्माण होणार आहे. त्यामुळे नियमांचा फेरविचार करून पूर्वीच्या आर्थिक बांधिलकीला संरक्षण द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

## रब्बी टोमॅटो लागवडीसाठी 'या' पद्धतीने करा रोपवाटिका व्यवस्थापन

खरीप महिन्यात टोमॅटोची कमी झालेली लागवड आणि पावसामुळे पिकांचे झालेले नुकसान व पर्यायाने उत्पादनात घट यामुळे बरेच शेतकरी आता रब्बी टोमॅटो लागवडीकडे वळण्याची शक्यता आहे. रब्बी हंगामात सप्टेंबर ते ऑक्टोबर या कालावधीत रोपवाटिकेत रोपे तयार केली जातात आणि ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात रोपांची पुनर्लागवड केली जाते..

रोपवाटिकेत टोमॅटो लागवड व्यवस्थापन :साधारणपणे सरळ वाणासाठी १६० ग्रॅम बियाणे तर संकरित वाणांसाठी ५० ग्रॅम बियाणे प्रति एकर पुरेसे आहे. लागवडीपूर्वी बियाण्यांना बीजप्रक्रिया करण्यासाठी थायरम किंवा कॅप्टन ३ ग्रॅम किंवा ट्रायकोडर्मा २.५ ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणात चोळावे. त्यानंतर ॲझोटोबॅक्टर २.५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळावे. साधारणपणे १ एकर क्षेत्रावर लागवड करण्यासाठी १.२ गुंठे क्षेत्रावर रोपवाटिका पुरेशी असते. रोपवाटिकेची जमीन आडवी व उभी नागरून कुळवाच्या दोन पाळ्या द्याव्यात. त्यानंतर ३ मीटर लांब, १ मीटर रुंद आणि १५ सें.मी. उंचीचे गादीवाफे तयार करावेत. गादीवाफ्यामध्ये ५ किलो चांगले कुजलेले शेणखत, ८० ग्रॅम १९:१९:१९ किंवा १०० ग्रॅम १५:१५:१५ आणि २०० ग्रॅम निंबोळी पेंड चांगले मिसळावे. सोबत ट्रायकोडर्मा ५० ग्रॅम एकसारखे मिसळून घ्यावे. जेणेकरून रोप वाटिकेमध्ये मर रोगाचा प्रादुर्भाव टाळला जाईल.गादीवाफ्यावर हाताने किंवा खुरप्याच्या सहाय्याने १० सें.मी. अंतरावर रेषा ओढून त्यामध्ये १ सें.मी. अंतरावर बी पेरावे. लगेच बी मातीने झाकून झारीने हलके पाणी द्यावे. साधारण ५ ते ८ दिवसांत बी उगवते. बी उगवे पर्यंत झारीने पाणी द्यावे. नंतर जमिनीच्या मगदूरानुसार पाटाने पाणी द्यावे. पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. रोपे उगवल्यानंतर ६०- १०० मेश नायलॉन नेट किंवा पांढरे पातळ कापड २ मीटर उंची पर्यंत मच्छरदाणी प्रमाणे गादीवाफ्यावर लावून रोपे झाकून घ्यावीत. रोपे २५ ते ३० दिवसांत पुनर्लागवडीसाठी तयार होतात.



# नाचणी लागवडीचे सुधारित तंत्र

महाराष्ट्रात नाचणी हे पीक प्रामुख्याने कोकण, कोल्हापूर आणि नाशिक विभागामध्ये मोठ्या प्रमाणात घेतले जाते. या तीन विभागात प्रामुख्याने रायगड, ठाणे सिंधुदुर्ग तसेच नाशिक, पुणे, कोल्हापूर, सातारा, नगर, धुळे, जळगाव या जिल्ह्यांचा समावेश होतो. अलीकडे उन्हाळी नाचणी लागवडीचे प्रयोग झाले आहेत.



जमीन : नाचणी लागवडीसाठी हलक्या ते मध्यम प्रतीची, चांगले सेंद्रिय पदार्थ असणारी, ५.५ ते ८.५ सामू असणारी जमीन योग्य असते. जमिनीची नांगरट करून पुरेसे शेणखत मिसळावे. हिरवळीचे खत जमिनीत गाडले असल्यास शेणखत किंवा कंपोस्ट खत देण्याची गरज नाही. जमिनीतील पूर्वीच्या पिकाची धसकटे, पालापाचोळा गोळा करून जाळून टाकावा, त्यामुळे खोडकिडीचा प्रादुर्भाव होत नाही.

लागवड तंत्र : ३० १० सें.मी. अंतरावर पाभरीने पेरणी केल्यास हेक्टरी दहा किलो बियाणे लागते. पुनर्लागवड पद्धतीने बियाणे पेरणी केल्यास पाच किलो प्रतिहेक्टरी बियाणे लागते. जास्त पर्जन्यमान असलेल्या भागात बियाणे गादी वाफ्यावर पेरून शेतात त्याची पुनर्लागवड करावी. गादीवाफे तयार करण्यासाठी रोपवाटिका तयार करावी. ५ १ मी. आकाराचे गादी वाफे तयार करून पेरणी करावी. हळव्या जातीची रोपे २१ दिवसांची झाल्यानंतर २२.५ सें.मी. बाय १० सें.मी. अंतरावर पुनर्लागवड करावी. गरव्या व निमगरव्या जातीची लागवडीसाठी रोपे २५ ते ३० दिवसांची वापरावीत. लागवडीसाठी व्ही. आर ७०८, व्ही. एल १४९, पी. ई. एस. ४००, दापोली १, एच. आर. ३७४, फुले नाचणीच्या सुधारित जातींची निवड करावी.

रोपवाटिका : एक हेक्टर क्षेत्र लागवडीसाठी पाच गुंठे रोपवाटिका पुरेशी होते. पाच गुंठे क्षेत्र रोपवाटिकेसाठी पाच क्विंटल शेणखत गादी वाफ्यावर मिसळावे. बियाणे गादी वाफ्यावर पेरणी केल्यानंतर १० ते १२ दिवसांनी प्रतिगुंठा ५०० ग्रॅम युरिया द्यावा.पुनर्लागवड : पुनर्लागवडीपूर्वी प्रतिहेक्टरी पाच टन शेणखत जमिनीत मिसळावे. हेक्टरी २५ किलो नत्र, ४० किलो स्फुरद, २५ किलो पालाश पुनर्लागवडीच्या वेळी द्यावे. राहिलेले २५ किलो नत्र प्रतिहेक्टर पुनर्लागवडीनंतर एक महिन्याने द्यावे.

आंतरमशागत : लागवडीनंतर साधारणपणे दोन वेळा खुरपणी करावी. पेरणी दाट झाली असल्यास पहिल्या २० ते २५ दिवसांपर्यंत विरळणी करून एका जागी एकच जोमदार रोप ठेवावे. कारण दाट पेरणी झाल्यास फुटवा कमी होऊन उत्पादन घटते.

युरिया, डीएपी ब्रिकेटचा वापर : गादी वाफ्यावर रोपे २५ ते ३० दिवसांची झाल्यानंतर शेतामध्ये रोपांची पुनर्लागवड २० बाय ४० सें.मी. जोडओळ पद्धतीने करावी. दोन ओळींतील अंतर २० सें.मी. ठेवून शिफारशीत खतमात्रेच्या ७५ टक्के खतमात्रा (नत्र ४५ किलो अधिक स्फुरद २२.५ किलो प्रतिहेक्टर) ब्रिकेट स्वरूपात द्यावी. ब्रिकेट देताना २० सें.मी.च्या जोडओळीत ३५ सें.मी. अंतरावर ५ ते ७ सें.मी. खोलीवर २.७ ग्रॅमची एक ब्रिकेट खोचावी.




### महत्वाच्या घटना

१५२२ : फर्डिनांड मॅगेलनच्या मोहिमेतील व्हिक्टोरिया हे जगप्रदक्षिणा करणारे पहिले जहाज स्पेनला पोहोचले.
१८८८ : चार्ल्स टर्नरचा एकाच मोसमात २५० क्रिकेट बळीचा विक्रम.
१९३९ : दुसरे महायुद्ध दक्षिण अफ्रिकेने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९५२ : कॅनडातील पहिले दूरचित्रवाणी केन्द्र मॉंट्रिअल येथे सुरू झाले.
१९६५ : पाकिस्तानचे अध्यक्ष जनरल अयुब खान यांनी भारताविरुद्ध युद्ध पुकारले. 'ऑपरेशन ग्रँड स्लॅम' ही त्यांची दिल्लीपर्यंत धडक मारण्याची योजना होती. पॅटन रणगाडे आणि सेबरजेट विमाने असलेल्या पाकिस्तानच्या घुसखोरीला प्रत्युत्तर देत भारताने पाकिस्तानवर हल्ला चढवला व पहिल्या भारत पाकिस्तान युद्धाची सुरूवात झाली. या युद्धात भारताने पाकिस्तानला सपाटून मार दिला.
१९६६ : दक्षिण अफ्रिकेचे पंतप्रधान हेन्ड्रिक व्हरवोअर्ड यांची संसदीय बैठक चालू असतानाच भोसकुन हत्या.
१९६८ : स्वाझीलँड हा देश स्वतंत्र झाला.
१९९३ : ज्येष्ठ कवी गोविंद विनायक तथा विंदा करंदीकर यांची कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या जनस्थान पुरस्कारासाठी निवड
१९९७ : अमेरिकेतील 'नॅशनल एन्डाऊमेंट फॉर द आर्टस' या संस्थेतर्फे विख्यात सरोदवादक अमजद अली खाँ यांची 'नॅशनल हेरिटेजफेलोशिप'साठी निवड
२००८ : डी. सुब्बाराव यांची भारतीय रिजर्व बँकेच्या गव्हर्नरपदी नियुक्ती करण्यात आली. त्यांनी ६ सप्टेबर पासून आपला पदभार सांभाळला.
२०१९ : भारतीय क्रिकेटपटू ऋषभ पंत कसोटी क्रिकेट सामन्यात सर्वात पहिले ५० गाडी बाद करण्याचा विक्रम आपल्या नावे करणरे पहिले यष्टीरक्षक बनले.
२०१९ : आपत्ती व्यवस्थापनेबद्दल आयोजित '' एक्सिलेंस अवार्ड'' ओडिसा राज्याने जिंकला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७६६ : जॉन डाल्टन इंग्लिश भौतिक व रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: २७ जुलै १८४४)
१८८९ : बॅ. शरदचंद्र बोस स्वांत्र्यसेनानी, झुंजार पत्रकार, नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे वडील बंधू (मृत्यू: २० फेब्रुवारी १९५०)
१८९२ : नोबेल पारितोषिक विजेते ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ सर एडवर्ड ॲपलटन यांचा जन्म.
१९०१ : कमलाबाई कामत तथा कमलाबाई रघुनाथ गोखले भारतीय चित्रपटसृष्टीतील पहिल्या स्त्री कलाकार. 'राजा हरिश्चंद्र' या पहिल्या मूकपटात त्यांनी भूमिका केली होती. त्यांचे चिरंजीव चंद्रकांत गोखले व नातू विक्रम गोखले अशा तीन पिढ्यांनी अभिनय क्षेत्र गाजवले. (मृत्यू: १८ मे १९९७)
१९२१ : बार-कोड चे सहसंशोधक नॉर्मन जोसेफ व्हाउडलँड यांचा जन्म. (मृत्यू: ९ सप्टेंबर २०१२)
१९२३ : युगोस्लाव्हियाचे राजा पीटर (दुसरा) यांचा जन्म.
१९२९ : यश जोहर हिन्दी चित्रपट निर्माता (मृत्यू: २६ जून २००४)
१९५७ : पोर्तुगालचे पंतप्रधान जोशे सॉक्रेटिस यांचा जन्म.
१९६८ : सईद अन्वर पाकिस्तानी डावखुरा फलंदाज व कप्तान. आपल्या पदार्पणाच्या कसोटी सामन्यात तो दोन्ही डावांत शून्य धावांवर बाद झाला होता. आपल्या पहिल्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यातही त्याने केवळ ३ धावा केल्या होत्या. मात्र नंतर त्याची कामगिरी एकदमच बहारदार झाली. एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांत सलग तीन शतके झळकावणाऱ्या मोजक्या खेळाडूंमध्ये त्याचा समावेश होतो.
१९७१ : भारतीय क्रिकेट खेळाडू देवांग गांधी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०७ : नोबल पारितोषिक विजेता प्रख्यात फ्रेंच कवी आणि निबंधलेखक सुल्ली प्रुडहोमी यांचे निधन.
१९३८ : नोबेल पारितोषिक विजेते फ्रेंच लेखक सली प्रुडहॉम यांचे निधन.
१९६३ : मंजेश्वर गोविंद पै तथा राष्ट्रकवी गोविंद पै कन्नड कवी व श्रेष्ठ भाषा संशोधक, इतिहास व तत्त्वज्ञानाचे व्यासंगी, त्यांना कन्नड, कोंकणी, इंग्लिश, तुळू, संस्कृत, तेलुगू, तामिळ, मराठी, कन्नड, बंगाली, पर्शियन, पाली, ऊर्दू, ग्रीक, जपानी इ. २५ भाषा अस्खलित येत असत. त्यांनी अनेक जपानी ग्रंथांचे कन्नडमध्ये भाषांतर केले. (जन्म: २३ मार्च १८८३)
१९७२ : अल्लाउद्दीन खाँ सरोदवादक व संगीतकार. हिन्दुस्थानी शास्त्रीय संगीतातील महर्षितुल्य कलाकार व संगीतकार. सरोद, व्हायोलिन, बासरी व अन्य अनेक वाद्ये ते तयारीने वाजवत असत. मैहर राजघराण्याचे दरबारी वादक. संगीत नाटक अकादमी पारितोषिक (१९५४), पद्मभूषण (१९५८), पद्मविभूषण (१९७१) इ. अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले आहे. (जन्म: ? ? १८६२)
१९८६ : सुरेश हरिप्रसाद जोशी आधुनिक गुजराथीतील प्रसिद्ध कवी, कथाकार व समीक्षक. त्यांनी काही भारतीय व परकीय साहित्यकृतींचे गुजराथीत अनुवादही केले. (जन्म: ३० मे १९२१)
१९९० : सर लिओनार्ड तथा 'लेन' हटन इंग्लिश क्रिकेटपटू (जन्म: २३ जून १९१६)
२००७ : इटालियन ऑपेरा गायक लुसियानो पाव्हारॉटी यांचे निधन.
२००९ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी व पंजाब राज्याचे माजी तेरावे मुख्यमंत्री हरचरण सिंह ब्रार यांचे निधन.



राज्य लोकतंत्र

# मराठवाडा वृत्तांत

सोमवार दि.७ सप्टेंबर २०२६ ५



# कव्हा येथे अवैध गांजा लागवडीवर स्थानिक गुन्हे शाखेचा छापा

## ०६ लाख ८२ हजार रुपयाचा १३ किलो ६५२ ग्रॅम गांजा जप्त; आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल

लातूर । प्रतिनिधी

जिल्ह्यातील अमली पदार्थांच्या अवैध व्यवसायाविरोधात सुरू असलेल्या कारवाईदरम्यान स्थानिक गुन्हे शाखेने मौजे कव्हा येथील कोळी गल्ली परिसरात छापा टाकून घराच्या बाजूच्या खुल्या जागेत करण्यात आलेली अवैध गांजाची लागवड उघडकीस आणली. या कारवाईत १३ किलो ६५२ ग्रॅम हिरवी गांजाची झाडे जप्त करण्यात आली असून, जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ६ लाख ८२ हजार ६०० रुपये इतकी आहे.

दि. ५ सप्टेंबर रोजी गुप्त बातमीदारामार्फत मौजे कव्हा येथील एका व्यक्तीने आपल्या राहत्या घराच्या पाठीमागील बाजूस असलेल्या खुल्या जागेत अवैधरित्या गांजाची झाडे लावल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.या माहितीची सत्यता पडताळून पोलीस अधीक्षक श्री.अमोल तांबे यांचे सूचनेनुसार व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण



यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. बावकर, यांच्या नेतृत्वातील पोलीस उपनिरीक्षक अमर केंद्रे, नायब तहसीलदार, लातूर, श्री.सतीश कांबळे, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे शासकीय कर्मचारी यांना पंच म्हणून तसेच प्रादेशिक न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या भ्रमण वैज्ञानिक पथकाला, व स्थानिक गुन्हे शाखेतील पोलिस अंमलदार यांना सोबत घेऊन सायंकाळी कव्हा येथील कोळी गल्ली परिसरात जाऊन संशयित व्यक्तीचा शोध घेतला. यावेळी मुक्तार गफुरसाब शेख (वय ४५ वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. कोळी गल्ली, कव्हा, ता. जि. लातूर) हा त्याच्या राहत्या घराच्या परिसरात आढळून आला.नायब तहसीलदार, शासकीय पंच व इतर अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संबंधित जागेची तपासणी केली असता घराच्या शेजारील खुल्या जागेत गांजाची झाडे लावून त्यांची निगा राखण्यात येत असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी सदर झाडे उपटून वैज्ञानिक पथकाच्या मदतीने त्यांचे वजन केले असता, गांजाचे एकूण वजन १३ किलो ६५२ ग्रॅम आढळून आले. प्रति किलो ५० हजार रुपये दराने जप्त गांजाची एकूण किंमत ६ लाख ८२ हजार ६०० रुपये इतकी असून ते जप्त करण्यात आले व दोन पोत्यांमध्ये भरून सीलबंद करण्यात आला. संपूर्ण कारवाईचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यात आले आहे. या प्रकरणी मुक्तार गफुरसाब शेख याच्याविरुद्ध गुंगीकारक औषधी द्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम, १९८५ मधील कलम ८(क) व २०(ब)()(ब) अन्वये पोलीस ठाणे लातूर ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर, पोलीस उपनिरीक्षक अमर केंद्रे, सफौ. सर्जेराव जगताप, पोलीस अंमलदार युवराज गिरी, रियाज सौदागर, प्रदीप स्वामी, सिद्धेश्वर मदने,जमीर शेख, राहुल कांबळे, काकासाहेब बोचरे, फोटोग्राफर सुहास जाधव, संतोष खांडेकर व व्यंकटेश निटुरे यांनी केली आहे.

# अवैध दारू विक्रीवर छापे; ७६ हजाराचा मुद्देमाल जप्त, दोन आरोपी अटक

जालना । प्रतिनिधी

परतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुप्त बातमीदाराच्या माहितीवरून पोलिसांनी दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापा मारून अवैध दारूची चोरटी विक्री करणाऱ्यांविरुद्ध धडक कारवाई केली आहे. या दोन्ही कारवायांमध्ये एकूण ७६,३५० रुपये किमतीची देशी व विदेशी दारू जप्त करण्यात आली असून दोन आरोपींवर महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदरील कारवाई (आंबा येथे) पोलीस पथकाने एका पत्र्याच्या शेडवर छापा मारला. या कारवाईत आरोपी गायकवाड हा विनापरवाना दारू विक्री करताना मिळून आला. त्याच्या ताब्यातून ऑफिसर चॉईस, मॅकडॉल नंबर १, रॉयल स्टॅग आणि भिंगरी संत्रा/बडीशेप या देशी-विदेशी दारूच्या एकूण ७३,८५० रुपये किमतीच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. दुसरी कारवाई रांजणी-परतूर रोडवरील मसला फाटा येथे असलेल्या एका शेडवर पोलिसांनी कारवाई केली. या ठिकाणी आरोपी दिपक शेजुळ (वय ३४



वर्षे, रा. मसला) याच्याकडून २,५०० रुपये किमतीच्या २५ देशी दारूच्या बाटल्या (भिंगरी संत्रा) जप्त करण्यात आल्या.

ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंग संधू, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.आर. टी. रेंगे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुदाम भागवत,पोलीस उपनिरीक्षक अमोल रावते,मपोकॉ/१५०० सपना देविदास वाघ, पोकॉ/१४१९ जाधव, पोकॉ, गोविंद पवार, ज्ञानेश्वर वाघ, परमेश्वर माने, नितीन बोन्डारे या पोलीस कर्मचाऱ्यांच्या पथकाने पंचांसमक्ष पार पाडली. दोन्ही कारवाया मिळून एकूण ७६,३५० रुपयांचा मुद्देमाल सील करून पोलीस ठाण्यात जमा करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(अ)(ई) अन्वये कायदेशीर गुन्हे नोंदवण्यात आले असून पुढील तपास पोहेकॉ/१४१९ देविदास जाधव हे करत आहेत.

# ताडहादगांव येथील गायरान जमिनीतून अवैधरित्या मुरुमाचा उपसा

जालना । प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील ताडहदगाव येथील गायरान जमिनीतून मुरमाचा चोरून उपसा करण्यात येत आहे मुरूम उपसा बंद करण्यासाठी ताड हदगाव तलाठी यांना गावकऱ्यांनी सांगून देखील कारवाई करीत नसल्यामुळे याप्रकरणी तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आली याबाबत तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आली. सामाजिक कार्यकर्ते कुंडलिक हरिचंद्र यांनी मुरूम बंद करण्याबाबत तक्रार दिली आहे.

एक महिन्यापासून ताडहादगांव येथील गायरान जमिनीतून गावातील ट्रॅक्टरवाले जे.सी.बी. च्या सहाय्याने अवैधरित्या मुरुमाचा उपसा करुन विक्री करत होते व सदर अवैधरित्या मुरुमाचा उपसा होत असल्याने मी सजाचे तलाठी ग्राम महसूल अधिकारी यांना फोन करुन त्याची कल्पना दिली व त्यांना विचारणा केली की, आपल्या परवानगीने सदरचे उत्खनन होत आहे काय यावर त्यांनी मी अशी कोणतीही परवानगी दिली नसल्याचे स्पष्ट सांगितले व आपण त्या विरोधात कायदेशीर कारवाई करू असे आश्वासन दिले. त्यानंतर ग्राम महसूल अधिकारी मॅडम गावात आल्यानंतर त्यांना सदरचे उत्खनन दाखवले असता त्यांनी थातुरमातुर पंचनामा करून कोणतीही कारवाई केली नाही.

परंतु काल दिनांक ०३/०९/२०२६ रोजी परत तेच ट्रॅक्टरवाले, जे.सी.बी.च्या सहाय्याने मुरुम उपसा करत असल्याचे दिसून आल्यानंतर मी ग्राम महसूल अधिकारी मॅडम यांना मोबाईल द्वारे संपर्क साधुन गावात अवैधरित्या उत्खनन होत असल्याचे त्यांचे निदर्शनास आणून दिले असता त्यांनी असे सांगितले की, मी गावातील पोलीस पाटील यांना सांगून सदरचे अवैध उत्खनन बंद करते परंतु सदरचे उत्खनन काही बंद झाले नाही असे समजल्यावरुन मी परत ग्राम महसूल अधिकारी मॅडम यांना मोबाईलद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी सांगितले की, मी उद्या ०४/०९/२०२६ रोजी सजावर आल्यानंतर त्या विरोधात कारवाई करते परंतु आज दिनांक ०४/०९/२०२६ रोजी मॅडम गावामध्ये आल्याच नाहीत असे मला समजल्यानंतर मी त्यांना मोबाईलद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी मोबाईल बंद करून ठेवला. मुरूम बंद न केल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्यात येईल असे यावेळी सांगण्यात आले. गंगाराम पोकळे व त्याचे इतर साथीदार यांना सदरचे अवैध उत्खनन करण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी यांची पूर्ण संमती असल्याचे दिसून येत आहे.

या मुरूम चोरीमुळे शासनाचं लाखो रुपयाचं महसूल डुबत आहे या मुरूम चोरीला तलाठी यांच्याकडून प्रोत्साहन देण्यात येत आहे. दश गैरकृत्य करणाऱ्या ग्राम महसूल अधिकारी मॅडम यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी. मी जे.सी.बी. वाले, ट्रॅक्टर वाले यांच्या विरोधात ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडे तक्रार करूनही कारवाई करण्यात येत नाही.

सदर जे.सी.बी. वाले व ट्रॅक्टरवाले यांच्या कडून माझे जीवीत्वास धोका होण्याची दाट शक्यता आहे. अंगावर ट्रॅक्टर घालू, जे.सी.बी घालू अशा प्रकारच्या धमक्याही देण्यात येत आहे.

उपविभागीय अधिकारी व तहसीलदार येणे सदर घटनेची प्रत्यक्ष जायमोक्यावर येऊन पाहणी करावी व ग्राम महसूल अधिकारी यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी तसेच जेसीबीवाले, ट्रॅक्टरवाले यांचे विरोध कठोरात कठोर कारवाई कारवाई करावी.

# प्राचार्य डॉ. भारत खंदारे यांना राज्य शासनाचा डॉ. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार'

मंठा। प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'डॉ. जे. पी. नाईक' आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार' लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयाचे प्राचार्य तथा व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. भारत खंदारे यांना प्राचार्य संवर्गातून जाहीर झाला आहे. शिक्षण क्षेत्रात समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या, शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी



सातत्याने प्रयत्नशील राहणाऱ्या आणि उत्कृष्ट प्रशासकीय कार्य करणाऱ्या प्राचार्य व प्राध्यापकांचा यथोचित गौरव करण्यासाठी राज्य शासनाकडून दरवर्षी हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. डॉ. खंदारे यांनी शिक्षण,संशोधन आणि महाविद्यालयीन प्रशासनात दिलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन त्यांची या सर्वोच्च पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

प्राचार्य डॉ. भारत खंदारे यांनी आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शैक्षणिक संस्थांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण काम केले आहे. व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणूनही त्यांनी विद्यापीठ व महाविद्यालयीन पातळीवर अनेक शैक्षणिक धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात मोलाचा वाटा उचलला आहे. त्यांना राज्य शासनाचा हा सर्वोच्च पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती आशाताई आकात, सचिव कपिल आकात, उपाध्यक्ष डॉ. कुणाल आकात, तसेच शैक्षणिक, सामाजिक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले.

# सोमनाथवाडीतील अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय सांगता!

## बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती शांतीब्रह्म तुकाराम महाराज भारती यांच्या काल्याच्या कीर्तनाने भक्तिरसात रंगला सोहळा

लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बालाघाटावरील सद्गुरू ईश्वर बाबा भारती यांच्या पावनभूमीत सोमनाथवाडी येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची भक्तिमय सांगता रविवारी (दि.६) श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान, बेलगावचे मठाधिपती महंत शांतीब्रह्म तुकाराम महाराज भारती यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. "तुझिये संगती जाली आमुची निश्चिंती; नाही देखिले ते मिळे! भोग सुखाचे सोहळे!" या जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या अभंगाच्या ओव्यांचा दाखला देत महंत तुकाराम महाराज भारती यांनी सुश्राव्य कीर्तनातून उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. संतसाहित्याचा आधार घेत भगवंताच्या सहवासाचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी भक्तांना आध्यात्मिक उन्नतीचा संदेश दिला.

दि.३१ ते ५ सप्टेंबरदरम्यान आयोजित सप्ताहात ह.भ.प. राजेभाऊ महाराज गवते (बेलुरा), ह.भ.प. अच्युत महाराज घोडके (श्रीगुरु बंकट स्वामी संस्थान, निनगुर), ह.भ.प. महंत महादेव महाराज गिरी (अंतरवाली सराटी), ह.भ.प. गणेश महाराज वारंगे (मादळमोही), ह.भ.प. श्रीकृष्ण महाराज उबाळे (चऱ्हाटा), ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे (मठाधिपती, बंकट स्वामी संस्थान निनगुर), ह.भ.प. बबन महाराज मंझरीकर (मंझरी) आदी नामवंत कीर्तनकारांनी विविध विषयांवर कीर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले. सप्ताहभर हरिजागर, दुपारची प्रवचनसेवा तसेच विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले. सांगतेनिमित्त आयोजित काल्याच्या कीर्तन सोहळ्यास ह.भ.प. महादेव भारती महाराज (बेलेश्वर संस्थान), व्यासपीठ चालक ह.भ.प. नवनाथ महाराज शेळके, मृदंगाचार्य भागवत महाराज चव्हाण, बजरंग महाराज पाहुणे, माऊली महाराज शेळके, जालिंदर महाराज सानप, शहादेव महाराज येडे, पंडित महाराज कदम, मोहन महाराज तावरे, विनोद महाराज वायभट, बबन महाराज इंगोले, किसन महाराज वायभट, भरत फरताडे, विलास फरताडे, चोपदार विठ्ठल महाराज मुळीक, सोमीनाथ महाराज पालखी यांच्यासह समस्त गावकरी व भजनी मंडळी उपस्थित होती. कीर्तनानंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. संपूर्ण सप्ताहकाळात परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के, बद्रीनाथ जटाळ, पालवनचे सरपंच मनोज पवार, दिपक मस्के, शुभम पवार, विशाल पवार, ह.भ.प.अनंतकाका मुळे , गणपत तागड,सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्यासह पंचक्रोशीतील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, भाविक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आई वडिलांची सेवा हिच ईश्वर सेवा:नवनाथ बाबा

बीड /प्रतिनिधी: आई-वडील हे पृथ्वी वरील परमात्म्याचे रूप आहे मनुष्याने आयुष्यात आई-वडिलांची सेवा करावी आई-वडिलांची सेवा हीच ईश्वर सेवा आहे. आई वडील हेच पृथ्वीतलावरील जिवंत तीर्थक्षेत्र आहे म्हणून मनुष्याने आई-वडिलांची सेवा करावी असे गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांनी बाबु नाईक तांडा येथे संत सेवालाल महाराज ग्रंथ सप्ताह सांगते वेळी काल्याच्या कीर्तनात अभंग विवेचनांमध्ये भाव व्यक्त केला संत सेवालाल महाराज यांचे ग्रंथ वाचन सांगते वेळी गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांचे काल्याच्या कीर्तनाचे आयोजन बाबूनाईक तांडा ढेकणमोह येथे आयोजित करण्यात आले होते.

**जालना : राज्य शासनाचा डॉ. जे. पी. नाईक आदर्श शिक्षक पुरस्कार राज्याचे शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. भारत खंदारे यांनी स्वीकारला. यावेळी शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवाळकर यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.**



# साहित्यिक किशन उगले शेकापूरकर यांचा जिल्हा परिषद शाळेत यथोचित सत्कार

## चार राष्ट्रीय, पंधरा राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित साहित्यिकाचा शिक्षक दिनी गौरव; विद्यार्थ्यांनी साकारला कृष्ण-राधेचा विलोभनीय देखावा

उदगीर। प्रतिनिधीर

साहित्य, काव्य आणि समीक्षेच्या क्षेत्रात आपल्या प्रतिभेचा ठसा उमटवत शेकापूर गावाचे नाव राज्याच्या साहित्यविश्वात उज्ज्वल करणारे भूमिपुत्र साहित्यिक, कवी व समीक्षक किशन दत्तात्रय उगले शेकापूरकर यांचा शिक्षक दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शेकापूर व शरदराव देशमुख यांच्या संयुक्त विद्यमाने यथोचित सत्कार करून गौरव करण्यात आला. सर्वपल्ली डॉ. राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात साहित्यिक किशन उगले यांच्या साहित्यिक व सामाजिक योगदानाचा गौरव करण्यात आला. आपल्या लेखणीच्या बळावर त्यांनी साहित्य क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली असून, त्यांच्या साहित्यिक कार्याची दखल घेत त्यांना चार राष्ट्रीय



पुरस्कार आणि पंधरा राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. तसेच त्यांच्या साहित्यिक प्रवासाला प्रसारमाध्यमांनीही दाद दिली असून सह्याद्री वाहिनीवर दोन वेळा मुलाखत, तर आकाशवाणी परभणी केंद्रावर तब्बल अकरा वेळा काव्यवाचन करण्याची संधी त्यांना मिळाली आहे. किशन उगले यांनी साहित्य क्षेत्रात केलेले कार्य विशेष उल्लेखनीय असून, त्यांनी तब्बल ३९० पुस्तकांचे समीक्षालेखन केले आहे. याशिवाय सात नाटकांचे लेखन व दिग्दर्शन करून रंगभूमी आणि साहित्यविश्वातही आपला ठसा उमटविला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय साहित्यिक वाटचालीमुळे शेकापूर गावाचे नाव उज्ज्वल झाले असून, गावाच्या साहित्यिक वैभवात त्यांनी मोलाची भर घातली आहे.

त्यामुळेच ते शेकापूरचे भूषण आणि आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात असल्याचे यावेळी उपस्थितांनी गौरवोद्गार काढले. या प्रसंगी शाळेचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक श्री. विश्व ब्रह्माजी व शरदराव देशमुख यांच्या हस्ते किशन उगले शेकापूरकर यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला मनोहर शिंदे, शिवलिंग मठपती, माधव शेल्हाळे, पिटाळे, दंडिमेसर पाटील, करंजीकर ताई, बिरादार ताई, काळे ताई, कांताबाई, कोंनाळे मठपती ताई यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत शिक्षक दिनाचे महत्त्व विशद केले. शरदराव देशमुख, मनोहर शिंदे, किशन उगले व मुख्याध्यापक विश्व ब्रह्माजी यांनी आपल्या मनोगतातून किशन उगले यांच्या साहित्यिक प्रवासातील विविध पैलू, अनुभव आणि योगदानाची माहिती सांगितली. कार्यक्रमाचे आणखी एक आकर्षण म्हणजे शाळेतील विद्यार्थ्यांनी साकारलेला कृष्ण-राधेचा मनमोहक वेशभूषेतील देखावा. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागातून वातावरण भक्तिमय आणि आनंदमय झाले. यावेळी पारंपरिक पद्धतीने दहीहंडीचा कार्यक्रमही उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. किशन आडे सर यांनी प्रभावीपणे केले, तर उपस्थितांचे आभार शाळेचे मुख्याध्यापक यांनी मानले.

साहित्याची साधना, पुरस्कारांची शिदोरी आणि गावाच्या मातीशी असलेली नाळ यामुळे किशन उगले शेकापूरकर यांचा साहित्यिक प्रवास आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरत आहे. शिक्षक दिनाच्या निमित्ताने झालेला हा सन्मान म्हणजे केवळ एका साहित्यिकाचा गौरव नसून, शेकापूरच्या मातीतून उगवलेल्या प्रतिभेचा आणि गावाच्या साहित्यिक अभिमानाचा सन्मान ठरला.

cmyk

दैनिक
राज्य लोकतंत्र

सोमवार दि.०७ सप्टेंबर २०२६ | ६

# राजे ९० कोटीच्या वाळूचे पुढे काय झाले?

## ना प्रकरण विधानसभेत आले, नाही न्यायालयात गेले; आमदारांच्या भूमिकेबाबत संशय

बीड । प्रतिनिधी

नव्वद कोटीची वाळू गायब झाल्यानंतर गेवराई मोठा गाजावाजा झाला. ही वाळू नेमकी तहसीलदार खोमणे कुठे नेऊन विकली याचा शोध लागत नव्हता. यावर मोठा गदारोळ झाला. जिल्हाधिकाऱ्यांनीही चौकशी समिती नेमली मात्र त्यानंतर कनिष्ठ कर्मचाऱ्यावर कारवाई करून हे प्रकरण जिल्हा अधिकारी कार्यालय स्तरावर तरी संपले. मात्र या प्रकरणी गेवराई विधानसभेचे आमदार विजयराजे पंडित यांनी जर खोमणेंवर कारवाई झाली नाही तर आपण हा प्रश्न विधानसभेत उपस्थित करू आणि वेळप्रसंगी न्यायालयातही जाऊ अशी भीम गर्जना केली होती. मात्र पुढे याचे काय झाले? हे जिल्ह्यातील नागरिकांना समजलेच नाही. ना हा प्रश्न विधानसभेत आला, नाही राजे न्यायालयात गेले मग नेमके या ९० कोटीच्या वाळूचे झाले काय? याचा शोध कधी लागणार असा प्रश्न जनतेच्या मनात आहे.

गेल्या दोन महिन्यापूर्वी गेवराई तालुक्यातील गोदा पात्रातील वाळू उपसा मोठ्या प्रमाणात चालू असल्याची चर्चा होत होती. यातच सरकारने मंजूर केलेल्या घरकुलांना प्रत्येकी पाच ब्रास वाळू मोफत द्यायचा निर्णय झाला.



ही वाळू गोदा काठावरून जिल्हाभरात सर्वच तहसील कार्यालयाकडे रवाना करण्याचे आदेश आले. प्रत्येक वाळू घाटावर किमान दोन हजार वाळू निघेल असा सरकारचा दावा होता. या दाव्या प्रमाणे चार वाळू घाटावर ८० हजार ब्रास वाळू निघणे अपेक्षित होते. प्रत्येक बाळू घाटावर २००० ब्रास वाळू निघणे अपेक्षित असताना ही वाळू प्रत्येक तालुक्यामध्ये पोहोच करण्याची जबाबदारी तहसीलदार खोमणे यांच्यावर होती. यासाठी नायब तहसीलदार, मंडल अधिकारी, ◀◀ पान ३ वर

### २००० ब्रास ची वाळू ४००० कशी झाली

प्रत्येक वाळू घाटावर दोन हजार ब्रास वाळू निघेल असा अहवाल जिल्हा अधिकारी कार्यालय प्रशासनाने दिलेला होता. मग ही वाळू वाढून ४ हजार कशी झाली? हा ही मोठा प्रश्न आहे.

### आमदारांचे घुमजाव नेमके कशासाठी?

आमदार विजयराजे पंडित यांनी या प्रकरणांमध्ये आपण संपूर्ण छडा लावल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही अशी भीम गर्जना केली होती. वेळ आली तर हा विधानसभेत प्रश्न उपस्थित करून न्यायालयातही जाऊ असे त्यांनी वारंवार सांगितले होते. मात्र पुढे ना ते विधानसभेत बोलले,नाही न्यायालयात गेले त्यामुळे आमदारावरच आता लोकांचा संशय निर्माण होत आहे.

### खोमणेंनी नेमके काय केले?

हे प्रकरण समोर आल्यानंतर तहसीलदार खोमणेंनी जिल्हाधिकारी, आयुक्त आणि संबंधित मंत्रालयाच्या सचिवांची भेट घेतली आणि नेमके काय सांगितले ज्यामुळे हे प्रकरण स्थानिक स्तरावर खोमणे भोवती फिरत असतांना खोमणेंच्या बाबतीत कसलीच कारवाई झाली नाही. नेमके खोमणेंनी काय जादू केली असाही प्रश्न उपस्थित होतो.

# भारतीय जनता पार्टीच्या बीड शहर प्रसिद्धीप्रमुखपदी शिवराज शिरसट पाटील

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा लोकनेत्या मा.पंकजाताई साहेब मुंडे, मा. खासदार प्रीतम ताई साहेब मुंडे, भाजपा युवा नेते डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर साहेब तसेच भाजपा जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख यांच्या नेतृत्वाखाली शिवराज शिरसट पाटील यांची प्रसिद्धी प्रमुखपदी निवड करण्यात आली.



भारतीय जनता पक्षाच्या बीड शहर प्रसिद्धी प्रमुखपदी शिवराज शिरसट पाटील यांची निवड करण्यात आली असून. पक्षाच्या संघटनात्मक कार्याला अधिक प्रभावीपणे प्रसिद्धी मिळवून देण्याच्या दृष्टीने त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

पक्षाची अधिकृत भूमिका, ध्येयधोरणे, संघटनात्मक उपक्रम, विविध कार्यक्रम तसेच जनहिताच्या विषयांची माहिती प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे आणि पक्षाच्या कार्याला व्यापक प्रसिद्धी मिळवून देणे, या दृष्टीने प्रसिद्धी प्रमुख म्हणून शिवराज शिरसट पाटील यांच्यावर महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या निवडीबद्दल भाजपा युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष तथा नगरसेवक ॲड. नागेश भैया तांबारे व नगरसेवक मंगेश भैय्या धोंगडे यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# ढेकनमोहा तांडा तलावातील अवैध विद्युत मोटारी काढल्या

## तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या आदेशाने महसूल व पोलिस प्रशासनाची संयुक्त कारवाई

बीड । प्रतिनिधी

मौजे ढेकनमोहा तांडा येथील लघुतलावातून अवैध पद्धतीने पाणी उपसा करणाऱ्या विद्युत मोटारी महसूल व पोलिस प्रशासनाच्या पथकाने ०६ सप्टेंबर रोजी काढून टाकल्या . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या आदेशान्वये करण्यात आलेल्या या कारवाईमुळे लघुतलावातील उपलब्ध जलसाठ्याचा अनधिकृत उपसा रोखण्यास मदत झाली आहे . यावेळी संबंधित शेतकऱ्यांना लघुतलावातून अवैध पद्धतीने पाणी उपसा करू नये , तसेच विद्युत मोटारी लावून पाण्याचा उपसा केल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल , अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या .



लघुतलावातील पाणीसाठा हा परिसरातील शेतीसह विविध गरजांसाठी महत्त्वाचा असल्याने उपलब्ध पाण्याचा नियमानुसार व योग्य पद्धतीने वापर होणे आवश्यक आहे . मात्र , ◀◀ पान ३ वर

### जलसाठ्याचे संरक्षण करण्याचे आवाहन

दरम्यान , लघुतलाव व इतर जलसाठ्यांमधील पाण्याचा अनधिकृत उपसा करू नये , उपलब्ध पाण्याचा काटकसरीने व नियमानुसार वापर करावा आणि जलसाठ्यांचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे , असे आवाहन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले आहे . लघुतलावातील पाण्याचा अवैध उपसा करणाऱ्या विद्युत मोटारी पुन्हा बसविल्याचे आढळून आल्यास संबंधितांविरुद्ध नियमानुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल , असा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला आहे . जलसाठे सर्वांच्या हितासाठी असून त्यांचे संवर्धन व संरक्षण ही सामूहिक जबाबदारी असल्याने नागरिकांनी प्रशासनाच्या कारवाईस सहकार्य करावे , असेही आवाहन करण्यात आले आहे .

# पाटोदा नगरपंचायतीचा फोल कारभार: पाण्यासाठीच्या कोट्यवधींच्या सर्वच योजना ठरल्या फुसका बार

## एकाही योजनेचे पाणी मिळेना, नागरिकांच्या उठावाशिवाय पर्याय नाही!

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहराची तहान भागवण्यासाठी नगरपंचायतीच्या माध्यमातून आजवर कोट्यवधी रुपयांच्या अनेक पाणीपुरवठा योजना शहरात आणल्या गेल्या. मात्र, नगरपंचायत प्रशासनाचा भोंगळ कारभार आणि नियोजनाचा अभाव यामुळे यातील एकही योजना यशस्वी ठरलेली नाही. योजनेवर योजना आल्या, निधी मंजूर झाला आणि कागदावर खर्चही दाखवला गेला; पण प्रत्यक्षात पाटोदावासीयांच्या नळाला पाणी मात्र कधीच आले नाही. नगरपंचायतीच्या या निष्काळजीपणामुळेच शहरावर आज ऐन पावसाळ्यात प्रतिटँकर ३०० ते ५०० रुपये मोजून पाणी विकत घेण्याची बिकट वेळ आली आहे.

योजना कोट्यवधींच्या, नळाला मात्र कोरड!

नगरपंचायतीने आजपर्यंत पाटोदा शहरासाठी कोट्यवधींचा निधी मंजूर करून आणला. नळ योजनेच्या नावाखाली प्रत्येक वेळी शहरातील रस्ते उखडले गेले, पाईपलाईन गाडल्या गेल्या आणि कंत्राटदारांनी बिले उचलून पोबारा केला. परंतु, एवढा निधी खर्च होऊनही आजतागायत एकही योजना यशस्वी का झाली नाही? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. नगरपंचायतीच्या अधिकाऱ्यांचे आणि लोकप्रतिनिधींचे कंत्राटदारांशी असलेले साटेलोटेच या सर्व अपयशी योजनांमागे असल्याचा थेट आरोप आता केला जात आहे.

नगरपंचायतीच्या नाकर्तेपणाचा फटका नागरिकांना

शहरातील पाणीपुरवठ्याची संपूर्ण जबाबदारी नगरपंचायतीचीच आहे. पावसाळ्यातच जर ३०० ते ५०० रुपये मोजून पाणी विकत घ्यावे लागत असेल, तर येणारा हिवाळा आणि ◀◀ पान ३ वर

# बैलपोळ्याच्या निमित्ताने युसूफवडगावचा आठवडी बाजार फुलला

## महागाई व दुष्काळाचे सावट असतानाही लाडक्या बैलांच्या सजावटीसाठी शेतकऱ्यांची खरेदी

युसूफवडगाव । प्रतिनिधी

बैलपोळा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने केज तालुक्यातील युसूफवडगावचा आठवडी बाजार बैलांच्या सजावटीच्या साहित्याने फुलून गेला आहे. गेल्या दीड महिन्यापासून पावसाने दडी मारल्याने शेतीवर दुष्काळाचे सावट निर्माण झाले असतानाही शेतकरी आपली परंपरा आणि संस्कृती जपण्यासाठी बैलपोळ्याच्या तयारीला लागला आहे.




बैलपोळा हा शेतकरी आणि त्याच्या जिवाभावाच्या बैलांमधील प्रेम, कृतज्ञता आणि ऋण व्यक्त करणारा पारंपरिक सण आहे. वर्षभर शेतात राबणाऱ्या बैलांना या दिवशी सजवून त्यांची पूजा केली जाते. त्यामुळे आर्थिक अडचणी असतानाही शेतकरी आपल्या लाडक्या बैलांसाठी आवश्यक साहित्याची खरेदी करताना दिसत आहेत.

युसूफवडगावच्या आठवडी बाजारात सध्या बैल सजावटीच्या साहित्याची विविध दुकाने थाटण्यात आली आहेत. माटाट्या, शेंब्या, तोडे, म्होरक्या, चंगाळे, गळ्यातील रंगीबेरंगी कापड, शिंगांना लावण्यासाठी वारणीस, बेगड, झुली यासह विविध आकर्षक साहित्य विक्रीस उपलब्ध आहे. विविध रंग व डिझाइनमधील सजावटीचे साहित्य ग्राहकांचे ◀◀ पान ३ वर

# तांदळा येथिल सप्ताहा सांगतात ५१ रक्तदात्यांनी केले रक्तदान!

मादळमोही । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तांदळा येथिल अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगतात ५१ रक्तदात्यांनी रक्तदान करत धार्मिक उपक्रमात समाजिक बांधिलकी जोपासली आहे, या सप्ताहा सांगतेत प्रेममुर्ती शिवाजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने भाविक भक्तांना मंत्रमुग्ध केले, या सांगता साठी परिसरातून जनसागर उसळला होता, या सप्ताहात ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व मधुर संगीत भागवत कथेने सर्व भाविक भक्तांना मंत्रमुग्ध केले होते. सप्ताहा सांगतेत प्रेममुर्ती शिवाजी बाबा यांच्या काल्याच्या किर्तन सर्व भाविक भक्तांनी श्रवण केले, हा सप्ताहा श्रावण मासातील गोकुळ अष्टमीच्या दुसऱ्या दिवशी सांगता येत असल्याने विशेष म्हत्वाचा मानला जातो.



या सप्ताहा सांगता नारायण गडाचे मंहत प्रेममुर्ती शिवाजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने होते, या सप्ताहा निमत्त मंदिराच्या कळसावर विशेष रोषणाई केले जाते, श्रावण मासातील धार्मिक कार्यक्रमात येथिल तरुण मंडळीने ५१ रक्तदात्याने रक्तदान करुन सामाजिक बांधिलकी जोपासली आहे या सप्ताहा सांगता ला बाहेरगावी कामधंदा व नौकरी ला गेलेली कुंटुब आवर्जून येत असल्याने व परिसरात भाविक भक्त मोठ्या प्रमाणात हजेरी लावल्यात असल्याने आनंदाच्या वातावरणात हा एक क्षण पर्वणीच असते, सप्ताहात नामवंत गायक, मंदगाचार्य संगीत विशारद, संत मंहताचे कीर्तने, भंजन, हरिपाठ, काकडा, पारायण, भागवत कथा विशेष लक्ष वेधणारी ठरले, महाप्रसाद च्या वाटपा नंतर हा सप्ताहा सांगता पार पडला,

# आ.सुरेश धस आणि देविदास धस यांच्या मार्गदर्शनाखाली साईनाथ पतसंस्थेचा यशस्वी कारभार

## पतसंस्थेची वार्षिक सभा खेळीमेळीत संपन्न, गुणवंत पाल्यांचा शालेय सॅक व स्मृतीचिन्ह देऊन गौरव

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कडा येथील 'श्री साईनाथ वीज सेवकांची सहकारी पतसंस्था' विविध सामाजिक उपक्रम प्रभावीपणे राबवत असून संस्थेच्या सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा गौरव करण्याचा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद आहे. पतसंस्थेची आर्थिक उलाढाल समाधानकारक असून संपूर्ण कारभार संगणकीकृत पद्धतीने पारदर्शकपणे चालवला जात आहे.संस्थेचे नवनियुक्त व्यवस्थापक स्वप्निल खकाळ हे संचालक मंडळ व पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम कामकाज पाहत आहे.या वर्षी सभासदांना साडेसात टक्के ७.५ टक्के लाभांश वाटप करण्यात येणार असल्याची माहिती युवा नेते जयदत्त धस यांनी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना दिली.

कडा येथील श्री साईनाथ वीज




सेवकांच्या सह. पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा कड्याचे माजी सरपंच श्रीरंग आप्पा कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.या पतसंस्थेचा आमदार सुरेश आण्णा धस आणि देविदास आबा धस यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी असा कारभार संचालक मंडळाकडून सुरू आहे.याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी, कड्याचे माजी सरपंच अनिल तात्या ढोबळे उपस्थित होते. पतसंस्थेचे चेअरमन विठ्ठल शेंबडे,व्हाईस चेअरमन रमेश बनसोडे,मानद सचिव शाकीर शेख,माजी चेअरमन प्रशांत पोकळे,अमृत वांढरे यांच्यासह संचालक अमृत आजबे,महेश घोडके,अमोल कर्डिले,अशोक काकडे,बापूराव कऱ्हे व आश्विन मंडाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

या वार्षिक सभेमध्ये नवनियुक्त व्यवस्थापक स्वप्निल खकाळ यांची अधिकृत नेमणूक सर्व मान्यवरांच्या समक्ष करण्यात आली.या वार्षिक सभेच्या औचित्याने शैक्षणिक क्षेत्रात घवघवीत यश संपादन करणाऱ्या सभासदांच्या गुणवंत पाल्यांना शालेय सॅक व स्मृतीचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. इयत्ता १२ वी – गौरी अनिलकुमार वांढरे (८८.७६ टक्के ),रुद्र अनिल कुमार वांढरे (८१. ३३ टक्के ), रोहित दिगंबर सोनवणे (६१ टक्के) इयत्ता १० वी – कु.तृप्ती रविकुमार कोकाटे (९२ टक्के ), समीक्षा किशोर काळे (८९.२० टक्के),सुमित दिगंबर सोनवणे (५७.८० टक्के) इयत्ता ७ वी – आरोही प्रशांत पोकळे ('अ-१' श्रेणी), कु.स्वरूपा किशोर काळे ('अ-१' श्रेणी) इयत्ता ४ थी -कु. वेदिका विठ्ठल शेंबडे ('अ-१' श्रेणी), शेख सरफराज शाकीर ('अ-१' श्रेणी), सृष्टी अभिमान गदादे ('अ-१' श्रेणी), शरयू भालचंद्र जगताप ('अ-१' श्रेणी), शिवकन्या शहाजी कर्डिले ('अ-१' श्रेणी) विद्यार्थ्यांनी जिद्द व चिकाटीच्या बळावर मिळवलेल्या यशाबद्दल उपस्थितांनी त्यांचे कौतुक करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या सभेस संस्थेचे सर्व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. वार्षिक सर्वसाधारण सभेत नफावाटप, उपविधी दुरुस्तीसह विविध विषयांवर चर्चा झाली.या पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभेत विषयपत्रिका जाहीर मांडण्यात आली. या सभेत संस्थेच्या आर्थिक वर्षाचा आढावा, नफावाटप, लेखापरीक्षण ◀◀ पान ३ वर

# वैद्यकीय विद्यार्थिनीवर अत्याचार करून ब्लॅकमेल करणारा गजाआड

बीड । प्रतिनिधी

एका वैद्यकीय शाखेच्या विद्यार्थिनीला गुंगीचे औषध देऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा तसेच तिचे आक्षेपार्ह फोटो व व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन ब्लॅकमेल केल्याचा धक्कादायक प्रकार बीड शहरात उघडकीस आला आहे. या प्रकरणात शिवाजीनगर पोलिसांनी अत्यंत तत्परता दाखवत एका चित्रपटगृहातून पीडितेची सुरक्षित सुटका केली असून आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.

शेख मुस्सवीर शेख वशीम (वय- रा. हीना पेट्रोल पंपाच्या मागे, मकसूद कॉलनी, बीड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

शिवाजीनगर पोलीस ठाण्यास एका गोपनीय बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली होती की, एका तरुणाने तरुणीला बीड शहरातील एका चित्रपटगृहात बळजबरीने नेले असून तेथे संशयास्पद हालचाली सुरू आहेत. माहिती मिळताच शिवाजीनगर पोलिसांच्या पथकाने क्षणाचाही विलंब न करता चित्रपटगृहात छापा टाकला आणि संशयित आरोपीसह पीडितेला ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणले.

महिला पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पीडितेची विश्वासात घेऊन विचारपूस करण्यात आली. त्यावेळी समोर आले की, आरोपी शेख मुस्सवीर याने तिला पिण्याच्या पाण्यातून गुंगीचे औषध देऊन तिच्यावर बळजबरीने लैंगिक अत्याचार केला होता. तसेच तिचे आक्षेपार्ह फोटो व व्हिडिओ काढून ते नातेवाईकांना पाठवण्याची आणि सोशल मीडियावर व्हायरल करण्याची सातत्याने धमकी दिली जात होती. याच ब्लॅकमेलिंगच्या जोरावर त्याने पीडितेला चित्रपटगृहात येण्यास भाग पाडले होते. पोलिसांच्या सतर्कतेमुळे पुढील मोठा अनर्थ टळला असून कुटुंबीयांच्या उपस्थितीत पीडितेचा सविस्तर जबाब नोंदवण्यात आला. तिच्या तक्रारीवरून आरोपी शेख मुस्सवीर याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

कारवाई करणारे पोलीस पथक

सदर उल्लेखनीय कारवाई बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कांवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख व उपविभागीय पोलीस अधिकारी व्यंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, सहायक पोलीस निरीक्षक दीपक लंके, पोलीस उपनिरीक्षक सागर सोन्ने, ज्ञानेश्वर धोत्रे, माधव काटकर तसेच पोलीस अंमलदार बाळू राहडे, अनिल घटमळ आणि ज्ञानेश्वर मराडे यांच्या पथकाने केली. महिला, तरुणी व विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेला पोलिसांचे सर्वोच्च प्राधान्य आहे. अशा कोणत्याही प्रकारच्या छळवणुकीस किंवा ब्लॅकमेलिंगला घाबरून न जाता नागरिकांनी तात्काळ व निर्भयपणे पोलिसांशी संपर्क साधावा; गुन्हेगारांवर अत्यंत कठोर कारवाई केली जाईल, असे आवाहन शिवाजीनगर पोलिसांकडून करण्यात आले आहे.




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk